


# नवनीत

२००६



कृतीतून शिक्षण



आपली शाळा वालवाडी

## प्रगत शिक्षण संस्था, फलटण
### वार्षिक पत्रिका

# नवनीत

मे २००६

**संपादकीय मंडळ**

गौरी कदम
संचिता निंबाळकर
गणेश कदम
नम्रता मगर

**संपादकीय सहाय्य**

डॉ. मॅक्सीन बर्नसन
डॉ. मंजिरी निमकर
सौ. स्वामिनी रूद्रभटे

**रेखाचित्रे**

मिलिंद, मुईन, विराज,
निखिल, अनिकेत (इ.६वी)
प्रिया,प्रणाली, गौरी, कोमल
श्रेया, संचिता ( ८ वी)

**मुखपृष्ठ**

नेहा राठोड (इ.२री)
वृक्ष गणना

**प्रकाशन :** प्रगत शिक्षण संस्था, रिंगरोड, फलटण ४१५ ५२३
**संगणकीय अक्षरजुळणी :** प्रकाश अनभूले,सीमा निंबाळकर, कमला निंबकर बालभवन
**मुद्रण :** श्री. प्रदिप पवार, कमिन्स डिझल इंडिया प्रिंटींग युनीट
प्रगत शिक्षण संस्था, फलटण
**फोन :** ०२१६६-२२३०४१
**email:** pssphl@sancharnet.in
**website:** www.pragatshikshan.com **or** www.indiaprogressiveeducation.com

# अनुक्रमणिका

अंकासंबंधी चार शब्द / सौ. स्वामिनी रूद्रभटे/ iii
वृक्षगणना / डॉ. मंजिरी निमकर / iv
बाबा / प्रथमेश बिदनूर/१
बच्ची, काव काव / सूर्यभान चव्हाण, प्रियांका लोखंडे /२
जिंकण्याचा आनंद / मुईन आतार, सुमित क्षीरसागर / ३
कुत्रा, शाळा / श्रीरंग उंडे, अंकिता फणसे /५
छंद प्रदर्शन/ क्षितिजा गोडसे /६
पिल्लूडी / शितल पानसरे, विराज तावरे/८
बुलबुल का बच्चा, पहचानो मै कौन / विराज तावरे, क्षितिजा गोडसे/१०
नशिबाने मिळवले ते कांजिण्यांनी गमावले / रेश्मा शिंदे/११
निसर्गाची मदत/स्वप्निल जगदाळे/१२
आकाशात, आमचे विषय/अक्षया पाटील, करिश्मा मुल्ला/१४
तरस/रणजित गुंजवटे/१५
जांबोरी:जांबोरी म्हणजे काय?,मी हाय कोली/संचिता निंबाळकर,गौरी कदम/१६
कसा केला प्रवास/गौरी कदम/१८
असा होता आमचा तंबू/गौरी कदम/१९
रात्र पावसाची/प्रणाली ढमाळ, श्रेया पाटील/२०
स्वप्न नव्हे सत्य/कोमल ढगे/२१
हरवलेला कॅमेरा/दिग्विजय कदम/२३
गंगातीरी/गणेश कदम/२४
गरूड झेप/प्राजक्ता पाटणकर/२५
खेण्यांच्या दुनियेत/विश्वजित सांगळे/२६
नाम्याची गोष्ट/ओमप्रकाश धुमाळ/२७
लांडगी/मिलिंद अहिवळे/२९
या जगात जन्मायचय मला!/मिनल चव्हाण/३१
अभ्यास मित्र बनला/पुष्कीन साळुंखे/३२
स्त्री/श्रध्दा कुलकर्णी/३४
ती भयाण रात्र/सूरज चौधरी/३५
मी स्वयंपाक शिकते/नम्रता मगर/३८
जे होते ते भल्यासाठीच /प्राजक्ता पाटणकर/४१
निवारा/शेषा जोशी/४४

# अंकासंबंधी चार शब्द

नवनीतच्या माध्यमातून यावर्षीही मुलांच्या अनुभवांचा, कल्पकतेचा आणि सृजशीलतेचा खजिना खुला करताना विशेष आनंद वाटतो आहे.

अंकाची रचना विचारपूर्वक व परिश्रमातून केलेली आहे. अंकाचे अंतरंग विविधतेने नटलेले असून रेखाटनांची कल्पकताही प्रभावी वाटते.

पक्ष्यांच्या दुनियेतला एक अविस्मरणीय अनुभव, निसर्गाची मदत, तरस, लांडगी यासारख्या अनुभव कथनातून व कथांमधून मुलांच्या मनातील निसर्गप्रेम, निसर्गाबद्दलची जाणीव व जागृती स्पष्ट दिसते. अभ्यासाचे तंत्र आणि मर्म सांगणारी पुष्कीनची 'अभ्यास मित्र बनला' ही कथा मुलांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल. जे होते ते भल्यासाठीच या प्राजक्ताच्या लेखामधूनही अभ्यास म्हणजे केवळ पुस्तकी अभ्यास नव्हे हेच स्पष्ट होते.

मी स्वयंपाक शिकते या विनोदी कथेतून नम्रताची तिच्या लेखणीवरची पकड स्पष्ट जाणवते. तर लांडगी आणि नाम्याची गोष्ट या कथांमधून मिलिंद व ओमप्रकाश यांची एक विशिष्ट शैली निर्माण होताना आढळते. मानव व रानटी प्राणी यांच्यातील जगण्यासाठीची धडपड व त्यामुळे निर्माण होणारे व्द्वंद्व 'लांडगी'मधून स्पष्ट उभे राहते.

यावर्षी स्काऊट गाइडची राष्ट्रीय जांबोरी हा शाळेच्या जीवनातला एक महत्वपूर्ण अनुभव असून तो अनुभव सर्व मुलांपर्यंत पोहोचविण्याचे काम जांबोरीबद्दलच्या विविध लेखांनी केले आहे.

श्रध्दा कुलकर्णीच्या 'स्त्री' या कवितेतून स्त्री-जीवनाच्या अस्तित्वाची महानता दिसते. तर 'या जगात जन्मायचंय मला' या मिनल चव्हाणच्या कवितेतून स्त्री-जीवनाच्या अस्तित्वासाठीची धडपड दिसते.

'छंद प्रदर्शन'सारख्या अहवालात्मक लेखनातून इतर मुलांना प्रेरणा मिळेल यात शंका नाही.

खेळण्यांच्या दुनियेत व ती भयाण रात्र यासारख्या लेखांमधून मुलांच्या स्वप्नांच्या दुनियेतील भयपटांचा पगडा जाणवतो.

अंकातील सर्व लेखक व कवींचे मनापासून कौतुक वाटते. या अंकाचा खर्च अजिता काळे स्मरणार्थ निधीतून निघाला आहे. त्याबद्दल आम्ही डॉ. अशोक काळे यांचे आभारी आहोत. दुर्दैवाने डॉ. अशोक काळे यांचेही गेल्या वर्षी आकस्मित निधन झाले. हा अंक पाहण्यास ते ही नसतील ही खंत मनाला आहे.

**सौ. स्वामिनी रूद्रभटे**

# वृक्षगणना २००६

२१ मार्च. जागतिक वनदिनानिमित्त कमला निंबकर बालभवनने वृक्षगणनेचा एक अभिनव उपक्रम हाती घेतला. पहिली ते आठवीचे सुमारे ३०० विद्यार्थी, २० शिक्षक आणि काही पालक व स्नेही यांनी या गणनेत भाग घेतला. साधारणतः १०-१२ फुटापेक्षा अधिक मोठी असणारी झाडेच वृक्ष म्हणून धरली. त्यामुळे आपोआप १-२ वर्षापेक्षा लहान असणारी झाडे वगळली गेली.

या वृक्षगणनेत शासकीय कार्यालये, शासकीय कर्मचारी व अधिकारी निवास, रस्ते, स्माशानभूमी, बागा, नगरपालिकेच्या शाळा, बस-स्थानक अशा शुध्द 'शासकीय' ठिकाणांबरोबरच खाजगी मालकीच्या परंतु सार्वजनिक वापराच्या मंदिरे, शाळा, कॉलेज, बझार व औद्योगिक ठिकाणांची वृक्ष गणनेत समावेश होतो. या गणनेत एकूण ४४८५ वृक्षांची गणना झाली असून त्यापैकी फक्त २२३४ वृक्ष 'सरकारी' जमिनीवर होते. बस स्थानक व रस्त्यावरील अनेक झाडे तोडली गेली असून केवळ बुडखेच राहिलेले आढळले.

ठिकठिकाणी रस्त्तारूंदीसाठी अथवा इतर विकास कामांसाठी अनेक वृक्ष तोडले गेले आहेत. परंतु तेथे नव्याने वृक्ष लावणे व जगवणे हा त्याच विकास-कार्याचा एक अपरिहार्य भाग न बनल्याने आज ही परिस्थिती निर्माण झाली आहे.

फलटणमधील वीटभट्ट्या, साखर कारखाना, पेटलेल्या कचराकुंड्या यांच्यामुळे हवेचे प्रचंड प्रदूषण होत आहे. सरासरी तापमानातही वाढ झालेली आहे. या साऱ्यामुळे होणाऱ्या त्रासापासून संरक्षण हवे असल्यास वृक्षांची अत्यंत गरज आहे. तेव्हा ५ जून या जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने वृक्षारोपण व संवर्धनाचा वसा आपण सर्व नागरिकांनी अंगिकारला पाहिजे.

**डॉ. मंजिरी निमकर**

# बाबा

प्रथमेश बिदनूर

इयत्ता ६ वी

आई सारखे दैवत साऱ्या जगतावर नाही हे वाक्य बरोबरच आहे. पण या वाक्यात मला एक बदल करावासा वाटत आहे. आई व बाबा यांच्यासारखे दैवत साऱ्या जगतावर नाही. आई आपल्यावर जितके प्रेम करते तितकेच प्रेम बाबा करत असतात. पण प्रत्येकाला वाटते की बाबा नुसते मारतात. हे चूक आहे. कारण ते शेवटी आपले पालनकर्ते असतात. आपल्याला लागले की आपण, "आई गं !" असे ओरडतो. पण काही हवे असते तेव्हा बाबांकडे जावे लागते ना? मी आणखी एक उदाहरण देतो. आपण दूर गावी रहात असतो तेव्हा आपण घरी फोन केला की फोन उचलतात बाबा. आपण म्हणतो "काय बाबा, काय करत आहात?" ते म्हणतात "काही नाही. काम करतोय." तेव्हा आपण म्हणतो, "आईला देता का फोन?" त्यावेळी बाबांना किती दुःख होत असेल. त्यांना सुध्दा वाटत असेल की आपल्या मुलाने आपल्याशी बोलावे. पण आपल्याला मात्र आईशी बोलावेसे वाटते.

माझ्या बाबांचे नाव राजेंद्र बिदनूर आहे. त्यांचे शिक्षण B.Com. पर्यंत झाले. ते मिरजेत फेमस स्टूडिओमध्ये होते. ते तेथे स्टिल फोटोग्राफी करत होते. त्यांना वाटले की आपला स्वतःचा व्यवसाय असावा. त्या नंतर केटरिंग निमित्त



मी व माझे बाबा फलटणला आलो. कारण मिरजेला अनेक खानावळी होत्या. मात्र फलटणला आमच्या इथल्यासारखे जेवण मिळत नव्हते. आम्ही फलटणला आलो. हवामानात

बदल झाल्याने मला ताप आला. साधारणतः ताप आला की बाबा नुसते मुलाला दवाखान्यात नेतात आणि सेवाशुश्रुषा आई करते. पण फलटणला फक्त मी व माझे बाबा असल्याने त्यांनी मला दवाखान्यात नेले. मला खायला घातले आणि डोकेसुध्दा चेपले. असे कुणाचे बाबा करतात का?

मी फलटणला आलो. मग मी कमला निंबकर बालभवनमध्ये शिकायला लागलो. शाळा संध्याकाळी सुटायची. मग मी शाळेतून आलो की बाबा माझ्यासाठी कधी केक तर कधी फळांचा ज्यूस करुन ठेवायचे. मग ते मेसची तयारी करायचे. मी शाळेतून आलो की बाबा मला विचारायचे, "काय प्रथमेश काय शिकवले शाळेत?". मग मी सांगायचो, "काय नाही नेहमी प्रमाणे तास झाले. फक्त उद्या हिंदी दिनानिमित्त आमचा कार्यक्रम आहे.त्या कार्यक्रमामध्ये मला घेतलंय".

आता मी बाबांना ओळखले आहे की बाबा किती चांगले आहेत. ते माझ्यावर किती प्रेम करतात. पाहिजे ती वस्तू आणून देतात. म्हणून मला सांगावेसे वाटते की फक्त आईच प्रेम करते असे नाही तर आईप्रमाणे बाबा सुध्दा आपल्यावर प्रेम करतात. ❑

## बच्ची

एक थी प्यारी बच्ची
नाम था उसका राणी
खाती आलू के पराठे
पीती दो ग्लास पानी

एक बार वह गई खेत में
तोडा उसने आम
लाथ मारी गाय ने
माँ ने लगाया बाम

**सूर्यभान चव्हाण**
इयत्ता ५ वी

## काव काव

कावळा करतो काव काव
म्हणतो माणसा झाडं लाव
फुलं फळं सावली सारं
झाडाच्या ठायी असतं न्यारं
फुकट आसरा घरचा सहारा
आनंदाच्या भरात
नका विसरू त्याला

**प्रियांका लोखंडे**
इयत्ता ९ वी

# जिंकण्याचा आनंद

## मुईन आतार, सुमित क्षीरसागर

इयत्ता ६ वी

शनिवारचा दिवस होता. ऊन कडक होते. जमीन तापली होती. आम्ही सहावीच्या मुलांनी सातवीच्या मुलांबरोबर मॅच लावली होती. अडीचची वेळ होती. सहावीची मुले मैदानावर जमली होती. आम्ही सातवीच्या मुलांची वाट पहात होतो. थोड्याच वेळात ती मुले आली. चौथीपासून आम्ही त्यांच्याबरोबर मॅच हारत आलो होतो. यावेळी आम्हाला मॅच जिंकायचीच होती. त्यामुळे आमच्या मनात एक जिद्द उत्पन्न झाली होती. आम्हाला सामना खेळण्याची उत्सुकता होती.

आम्ही बर्वे ग्राऊंडवर गेलो व टॉस उडवला. आमच्या कॅप्टनने (स्वप्निलने) टॉस जिंकला. आम्ही फलंदाजीचा निर्णय घेतला. समीर आला होता. त्यामुळे मॅच जिंकण्याची आम्हाला आणखी आशा होती. मुईन व समीर प्रथम फलंदाजीला गेले. समीरने संदेशच्या गोलंदाजीला चौथ्या चेंडूला षटकार लगावला व सहाव्या चेंडूला चौकार लगावला. त्यामुळे पहिल्याच षटकात दहा धावा केल्याने आम्हा मुलांत जल्लोष झाला परंतु दुसऱ्या षटकात समीरचा त्रिफळा अभिषेकने उडवल्याने आमच्यात निराशा निर्माण झाली. नंतर सुमित आला. परंतु थोड्याच वेळात सुमितही परतला. झटपट दोन गडी बाद झाल्याने आमचा धावफलक २ बाद १० धावा व २ षटक असा होता. नंतर सौरभ व मुईनने सहावीच्या वर्गाला आधार दिला. चार षटकांत १८ धावा झाल्या. सौरभ ७ धावा करून परतला. नंतर सर्वजण थोड्या थोड्या धावा करून परतले. दहाव्या अंतिम षटकात मुईनने षटकार लगावला व अनिकेतने ३ धावा पळून काढल्याने आमच्या एकूण ३३ धावा झाल्या होत्या.

आता सातवीची फंलदाजी होती. स्वप्निलच्या षटकाला प्रथम १० धावा निघाल्या. नंतर मुईनने त्याच्या षटकात २ धावा देऊन अभिजीतची विकेट घेतली. पाचव्या षटकात स्वप्निलने अक्षयला चकवून

सुमितच्या हाती झेल दिला. हळहळू धावा वाढू लागल्या.फलंदाज बाद होऊ लागले. नवव्या षटकापर्यंत सुमितने प्रतिकला फसवून त्यानेच झेल घेतला. शेवटच्या षटकात त्यांच्या २७ धावा झाल्या होत्या. त्यांना जिंकण्यासाठी ६ धावा बाकी होत्या. स्वप्निलच्या षटकात पाहिल्या चेंडूत २ धावा पळून काढल्या दुसऱ्या चेंडूला संदेशचा त्रिफळा काढून जणू त्यांच्या तोंडातून घास काढला. शेवटच्या ४ चेंडूत एकही धाव न देता आम्ही सामना जिंकला व सहावीच्या टीममध्ये जल्लोष झाला. तो दिवस आम्ही कधीच विसरु शकलो नाही. तो विजय म्हणजे आमच्या मनातला ऐतिहासिक विजय होता.

❑



# कुत्रा

## श्रीरंग उंडे

इयत्ता ४ थी

मे महिन्याची सुट्टी लागताच मी माझ्या आजोळी गेलो होतो. एक दिवस आम्ही शेतात चिक्कू काढण्यासाठी गेलो होतो. तिथे मोती नावाचा एक भयंकर कुत्रा होता. त्याची आम्हा सर्वांना फार भिती वाटायची. म्हणून आम्ही हातात काठी घेऊन चाललो हातो. प्रत्येक जण बढाया मारत होता. मोती आल्यावर 'मी हे करीन', 'मी ते करीन.' आणि अचानक मोती समोर आला. सर्वांच्या अंगाला घाम फुटला. आम्ही सर्व लटपटू लागलो. हिम्मत करून आम्ही पळून जाण्याचा विचार केला. पण मी म्हणालो की आमच्या बाईंनी सांगितले आहे, "कुत्र्यासमोरुन पळायचे नसते. पळाले तर ते चावते." म्हणून आम्ही पळालो नाही. मग तो काही न करता परत गेला. तेव्हा सर्वांच्या जिवात जीव आला.

## शाळा



माझी आहे सुंदर शाळा
तिच्यामुळे मला लागला अभ्यासाचा लळा
दगड विटांनी बांधलेली इमारत शाळा नसते
तर ती जिवंत वास्तूच असते
येथे असतात मुले बहुढंगी
जशी बागेत फुले रंगीबेरंगी
स्नेहसंमेलनात असते कमाल
मित्रांबरोबर असते नुसती धमाल
अशी ही शाळा आवडते मला मनापासून
कधी न व्हावे दूर हिच्यापासून


**अंकिता फणसे**
इयत्ता ८ वी

# छंद प्रदर्शन

क्षितिजा गोडसे

इयत्ता ७ वी

वर्गात मराठीचा तास सुरु होता. आशाताई आम्हाला 'निसर्ग आपला मित्र'हा पाठ शिकवत होत्या. त्या आम्हाला सलीम अली यांच्या पक्षी निरीक्षणाच्या छंदाबद्दल माहिती देत होत्या. तेवढ्यात अचानक त्यांच्या



डोक्यात एक कल्पना आली आणि त्यांनी आम्हाला विचारले "तुमच्या-पैकी प्रत्येकाचाच काही ना काही छंद असेलच." आम्ही सर्व 'हो' म्हटलो. बाई म्हणाल्या, "या आठवड्यात प्रत्येकाने आपआपला छंद मला दाखवायला आणा आणि मी सुध्दा तुम्हाला माझा छंद दाखवते." दुसऱ्या दिवशी चार-पाच जणांनी आपापला छंद दाखवला. नंतर तिसऱ्या दिवशी मात्र निम्याहून अधिक जणांनी बाईंना स्वतःचा छंद दाखवला. प्रत्येकाचा छंद पाहून बाईंना आनंद झाला. त्या म्हणाल्या, "या प्रत्येकाच्या छंदाचे आपण प्रदर्शन भरवूया. म्हणजे सर्वांना तुमचा छंद पाहायला मिळेल." बाईंनी तसे सांगण्याचा अवकाश की प्रत्येकजण प्रदर्शनाच्या तयारीला लागले. मी ५वी पासून छोटे-मोठे, वेग-वेगळ्या आकाराचे, रंगीबेरंगी दगड-गोटे साठवले होते. त्याचबरोबर मी वेगवेगळ्या प्रकारचे शंख सुध्दा साठवले होते. केतकी बोरावकेने जुनी परदेशी नाणी साठवली होती. तिच्या बरोबरच प्रणव, प्रतिक,




करिश्मा, अभिषेक व पवनने सुध्दा नाणी व नोटा साठवलेल्या होत्या. प्रतिकने सुंदर-सुंदर चित्रे काढून ग्रिटिंग्ज बनवलेली होती. माझ्या बरोबरच शलाका, केतकी हेंद्रे व करिश्माने छोटे दगड साठवले होते. तर शलाका, प्रज्ञा व अक्षय शिंदेने वाळूतील छोटे शंख साठवले होते. सूर्यजीतने मेणाच्या वस्तू बनवलेल्या होत्या. मिनलने पक्ष्यांची सुंदर, रंगीत पिसे व पोस्टाची तिकिटे साठवलेली होती. मेघाने वेगवेगळ्या प्रकारच्या लग्न-पत्रिका साठवलेल्या होत्या. ओंकारने वेगवेगळ्या मेणबत्त्या बनवल्या होत्या. शलाकाने बिया साठवलेल्या होत्या. अक्षय शिंदेने बुक-मार्कस् बनवलेले होते. सायली माने, सायली कुमठेकर, पूजा गरुड, पूजा गुळस्कर, दिपाली, दक्षता, ओंकार, कौस्तुभ, संदेश, आश्विनी, आरती, मोहिनी यांनी हस्तपुस्तिका तयार केल्या होत्या. त्यात त्यांनी जनरल नॉलेज वरचे प्रश्न, कविता, गाड्यांची चित्रे, WWF चे पोस्टर, विनोद, बोधकथा इत्यादीचे चिकट-काम केले होते. असे वेगवेगळे छंद आम्ही सर्वांना प्रदर्शनाच्या रूपाने दाखवणार होतो. एक आठवडा आमची वर्गात सतत छंदाच्या प्रदर्शनाविषयीची चर्चा चालायची. पण आम्ही प्रदर्शन भरवणार आहोत हे कोणाला सुध्दा कळू दिले नव्हते. आमचा प्रदर्शनाचा दिवस निश्चित झाला. १५ ऑगस्ट. कारण या दिवशी शाळेत जवळ-जवळ सर्व पालक येतात. त्यामुळे सर्वजण आमचे प्रदर्शन पाहू शकले असते. तसे आम्ही दोन दिवस प्रदर्शन ठेवणार होतोच. मग आमची प्रदर्शनाची तयारी सुरू झाली. मोठी कार्डशीट्स्, प्रत्येकाचे नाव लिहिण्यासाठी कागद व उद्घाटनासाठी रिबिन आणायची होती. यासाठी खर्च होणार म्हणून आम्ही वर्गातील प्रत्येकाने ५ रु. गोळा केले. पैसे गोळा करण्याचे काम संदेशकडे होते. पैसे गोळा झाल्यानंतर सर्व साहित्य आणले गेले. मग बाईंनी प्रदर्शन मांडण्याकरिता १४ तारखेला रविवारी आम्हाला शाळेत बोलावले. आम्ही प्रत्येकजण आपआपला छंद घेऊन हजर झालो. प्रदर्शन T.V. हॉलमध्ये भरविण्याचे निश्चित झाले. मग आम्ही T.V.हॉल झाडून स्वच्छ केला. तेथे ओळीने टेबले मांडली. त्यावर बेडशीटस् टाकली. काही टेबलाशी वर टाकायला बेडशीटस् पुरले

(पान नं ४३वर)

# पिल्लूडी

शितल पानसरे, विराज तावरे
इयत्ता ६ वी

आज शनिवार. आमचा तास होता. पंख्यावर एक बुलबुलचे घरटे होते. त्या घरट्यात दोन पिल्ले होती.एकादा पंख्याला धडकून त्यांची आई मेली. घरट्यातले मोठे पिल्लू उडून गेले. मग राहिले एकच पिल्लू. आम्ही सगळे गाणी म्हणू लागलो की



ते सुध्दा मोठ्याने चीss चीss आवाज काढून आमच्याकडे खाली पाहू लागले. दुसऱ्याच क्षणी ते खाली पडले. खूपघाबरले होते ते. आम्ही त्याला पेटीवर ठेवले.

तास संपल्यावर मी, विराज व मिलिंदने मंजूताईंना विचारले, "त्या पिल्लाला आम्ही घेऊन जाऊ का?" त्या म्हणाल्या, "ठीक आहे. पण त्याला चेरी, गांडूळ खायला घाला". आम्ही सर्वांनी मिळून एक पेटी शोधली. त्यात कापड टाकून पिल्लाला ठेवले. त्याला ड्रॉपरने पाणी पाजले व पोहे खायला घातले. मग ते झोपले. थोड्या वेळाने मला आजोबांनी बोलावले व ते म्हणाले, "आपल्या घरात हे पक्षीबिक्षी ठेवायचे नाहीत." मग विराज ते पिल्लू त्याच्या घरी घेऊन जायला तयार झाला.

विराजला सुध्दा वाटत होते की त्याची आई त्याला रागवेल. म्हणून तो व मिलिंद मागच्या दाराने वरच्या खोलीत गेले. तेथे पिल्लाला ठेवले. तेवढ्यात त्यांची आई खोलीत आली. विराज घाबरला. घाबरत म्हणाला "च ss च ss चार पाच दिवस या पिल्लाला आपल्या जवळ ठेऊ मग त्याला सोडून देऊ". त्याची आई म्हणाली "मग

त्याला आपल्या भाजीच्या जाळीच्या टोपल्यात ठेव". विराज पळतच गेला आणि भाजीची टोपली आणली त्यात गवत टाकले व त्यात पक्ष्याला ठेवून झाकण लावले.

विराजच्या घरचे सगळेच त्या पिल्लावर प्रेम करु लागले होते. विराजचे वडील म्हणाले, त्याला डाळीचे पाणी पाज. दुपारच्या वेळी विराज शाळेत आला की त्याची आजी पिल्लाला खायला घालायची शाळेतून आल्यावर विराज त्याला खायला घालायचा. मग ते पिल्लू झोपायचे. सकाळी लवकर उठून विराज त्याच्याजवळ जाऊन त्याला म्हणायचा, "इतर पक्षी कसे उडतात. तसे तू का नाही उडत?" पण ते लहान असल्यामुळे नीट उडता येत नव्हते. विराजच्या घराजवळचे मित्र त्याला बघायला यायचे. हळूहळू ते सगळ्यानाच ओळखू लागले.

पिल्लाला पंख वापरायचा सराव व्हावा म्हणून आजीच्या सांगण्यावरून एकदा विराजने टोपलीचे झाकण उघडे ठेवले. तासावरून आल्यावर पाहतो तर काय, टोपलीत पिल्लूच नव्हते. मांजराने खाल्ले की काय म्हणून तो सर्वांवर चिडला. त्याचे डोळे भरून आले.आता पाणी गालावर ओघळणार तेवढ्यात स्वयंपाकघरातून ची ss ची ss असा आवाज आला. आजी, आई सगळेच पळत स्वयंपाक घरात गेले. तर ते स्टुलाच्या खाली बसले होते.


एके दिवशी सर्वांना दाखवण्यासाठी विराज त्या पिल्लाला शाळेत घेऊन आला. विराजच्या गोष्टी ऐकून पिल्लू आपल्याही घरी ठेवावे असे मला वाटले. म्हणून मंजूताईंच्या परवानगीने मी पिल्लू घेऊन आनंदातच घरी येत होते. माझ्या मनात एकच भीती होती. आजी आणि आजोबा काय म्हणतील. मी घरी गेले. आजोबा बाहेरच बसले होते. मी काही बोलायच्या आधीच ते म्हणाले, "तसलं पिल्लू-बिल्लू काही आणलं असेल तर त्याला बाहेरच ठेव. आत काही आणू नकोस". मग मी त्यांना दोन-तीन थापा मारून समजावले. आई म्हणाली ठीक आहे पण त्याची घाण वगैरे सगळी तू काढायचीस. मला थोडेसे कसेतरी वाटले पण मी आनंदाने होकार दिला मग मी त्या पिल्लाबरोबर चक्क फोटो काढले. ते सकाळी सहालाच उठून ची ss ची ss करायचे.


**(पान नं २५ वर )**

## बुलबुल का बच्चा

बुलबुल का बच्चा नीचे गिरा
गिरकर वह घायल हुआ
उसको उठाया घर लाया
दाना पानी रोज खिलाया
मैं बहुत प्यार करता था उसको
दूर नहीं रखता था उसको
पाँच हफ्ते गए थे बीत
अब वह भी हो गया था ठीक
एक दिन उडकर जाएगा
याद मुझे वो आएगा!

**विराज तावरे**
इयत्ता ६ वी





## पहचानो मै कौन?

हरी डाल पर बैठे पंछी कई सुंदर
Who are you? बोले उनसे बंदर
पंछी बोले हमें तुमही पहचानो
By शब्द में नाम छुपा है जानो
सारे बंदरों ने दिमाग चलाया
पर नाम न कोई जान पाया
एक बंदर KNB आया
By कहते बच्चों को पाया
उसे कुछ कुछ याद आया
हरी डाल पर बंदर ने बैठे
"बया...बया" शोर मचाया

**क्षितिजा गोडसे**
इयत्ता ७ वी

# नशीबाने मिळवले ते कांजिण्यांनी गमावले

रेश्मा शिंदे

इयत्ता ६ वी

माझी दीदी कमला निंबकर बालभवन या शाळेत लहान गटापासून शिकत होती. तिची प्रगती पाहून माझ्या बाबांनी मला या शाळेत इयत्ता तिसरीमध्ये घातले. मी पहिल्यांदा या शाळेत आल्यावर माझ्या दीदीशिवाय कोणीही ओळखीचे नव्हते. आधीच्या शाळेत प्रार्थना आणि राष्ट्रगीत म्हटले की झाले. पण या नवीन शाळेत तसे नव्हते. तर सर्वात आधी प्रार्थना हॉलमध्ये सर्वांनी जमायचे. मग पसायदान आणि प्रार्थना म्हणायची. ती रोज वेगवेगळी असे. मग बातम्या व तापमान वाचून दाखवायचे आणि नंतर राष्ट्रगीत व प्रतिज्ञा म्हणायची. अशाप्रकारे ही शाळा खूपच वेगळी होती. या शाळेत आल्यावर माझ्या खूप इच्छा होत्या. शाळेत नाव कमावणे, पायलट होणे वगैरे वगैरे. एकदा माझा चौथीत असताना बातम्यांचा वार होता. मी त्या घाबरत घाबरत वाचल्या आणि त्या सर्वांना आवडल्या. माझे फळ्यावर नावसुध्दा लिहिले. फेब्रुवारी महिना उजाडला. शाळेतील प्रकल्प, सहली सगळे झाले होते. आता एकच पण खूप महत्त्वाचे आणि सर्वांना आवडणारे स्नेहसंमेलन होणार होते. मला आमच्या बाईंनी माईममध्ये घेतले होते. ते मला नीटनेटके करताही येत नव्हते. स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन इयत्ता चौथीकडे असते. त्यामुळे शीतल आणि समीर हे दोघेजण सूत्रसंचालन करणार होते. पण ते समीरला काही नीट जमत नव्हते. मला माईम जमत नव्हते आणि समीरला सूत्रसंचालन! मग वसीमदादाने exchange करायचे ठरवले. मला सूत्रसंचालन आणि समीरला माईम. सर्व परफेक्ट बसले. आणि मी सूत्रसंचालन करणार हे ठरले. जेव्हा मी हे दीदीला सांगितले तेव्हा तिचा विश्वासच बसला नाही. आता मी खूप उत्साहाने तयारीला लागले. खूप कष्ट केले. कष्टाचे चीज व्हायला फक्त एकच दिवस बाकी होता. शाळेत रंगीत तालीम होती. (पान ४४ वर)

# निसर्गाची मदत

स्वप्निल जगदाळे

इयत्ता ६ वी

विदर्भातील खेडेगाव. तेथे शेती हाच प्रमुख व्यवसाय. लोक कुठे बसले की त्यांची शेतीचीच बोलणी सुरू व्हायची. एकदा असेच पारावर बसून ते बोलत होते. तेथे सरपंच, पाटील यांसह रामदेवही होता. रामदेव हा या गावाचा शेतकरी होता. त्याची शेती जवळ जवळ शंभर एकर होती. त्यांचे पीक नेहमी चांगलेच असे. तो त्याच्या शेतात राहायचा. पण हळू हळू पैसे साठवून गावात घर बांधले व गावात रहायला गेला. शेतातले जुने घर पडझड झालेल्या अवस्थेत होते. पण तो त्याच्या गावातील घरी रहायला गेला तेव्हापासून त्याचे पीक खूपच चांगले यायला लागले होते. रामदेवचा एक मुलगा होता. तो हुशार व विचारी होता.

एकदिवस पारावर बसत असताना सरपंच म्हणाले, " का रं रामदेव त्यो रानातला तुटका वाडा तुझाच हाय न्हवं?" रामदेव हो म्हणाला."मंग त्यो वाडा पाड."- सरपंच म्हणाले "आसं कसं हुईल? तिथे आम्ही इतके दिवस राहिलो त्यो वाडा पाडू?" रामदेव म्हणाला. "आरं तिथं तुला कायबी लावायला ईल म्हणून म्हणतुया"



सरपंच म्हणाले. मग रामदेव म्हणाला विचार करीन आणि तिथून निघून गेला.

घरी गेल्यावर त्याने घरातल्यांना विचारले. सर्वजण हो म्हणाले पण रामदेवचा मुलगा नाही म्हणाला. मात्र त्याचे कोणी ऐकले नाही आणि

दुसऱ्याच दिवशी वाडा पाडायला सुरूवात केली. वाडा पाडत असताना एकदमच आतून वटवाघळे बाहेर पडली व उडून गेली. त्यांची आतील विष्ठा रामदेवला शेतात खत म्हणून वापरता आली. यामुळे पीक खूप चांगले उगवले. त्याला वाटले की चांगलेच झाले आपण तो वाडा पाडला. त्यामुळे मला खत मिळाले आणि माझे पीकही चांगले आले.

काही वर्षे गेली. रामदेवला त्याच्या शेतातील पाहणीतून असे लक्षात आले की त्याने जेव्हा पासून वाडा पाडला आहे तेव्हापासून त्याच्या शेतातील पिकांवर जास्त कीड येते. एकदा त्याने जेवता जेवता हा विषय काढला. तेव्हा रामदेवचा विचारी मुलगा म्हणाला, "बाबा, त्या पडक्या वाड्यात राहणारी वटवाघळे आपल्या पिकावरील किडे कीटक खात असते. पण वाडा पाडल्यामुळे वटवाघळांना रहायला जागाच राहिली नाही. ती निघून गेली व पिकावरील कीड वाढली. पण या गोष्टीवर रामदेवचा विश्वास बसला नाही. पण हळूहळू वाढते नुकसान पाहून रामदेवने आपल्या मुलाला विचारले की यासाठी काय केले पाहिजे? तेव्हा त्याचा मुलगा म्हणाला की आपण आपल्या शेतात थोडी जागा ठेवली पाहिजे व तेथे आपण आपला पूर्वीच्या वाड्यासारखा निवारा बांधायला पाहिजे कारण तेथे वटवाघळे राहू शकतील व त्यांची विष्ठा आपल्याला खत म्हणून वापरता येईल.

रामदेवने तसे केले. त्याने त्याच्या शेतात थातूर मातुर भींती व एक छप्पर बांधले. दोन चार महिन्यांनी तेथे वटवाघळे रहायला लागली आणि पुन्हा रामदेवचे पीक जोमाने येवू लागले. .

❑

## आकाशात

काळ्या अफाट आकाशात
होत्या छोट्या चांदण्या
अतिशय सुबक प्रकारे
त्याच्या केल्या होत्या मांडण्या

काळ्या अफाट आकाशात
मजेत होते सारे
काही होते ग्रह
काही होते तारे

काळ्या अफाट आकाशात
होता एक चांदोबा
सर्व म्हणत होते
ससा त्याचा लाडोबा

काळ्या अफाट आकाशात
आला थोडा प्रकाश
हळू हळू दिसू लागले
काळे निळे आकाश

निळ्या काळ्या आकाशात
सूर्य आला दूरून
अचानक चंद्र चांदण्या
कोठे गेल्या विरून

**अक्षया पाटील**
इयत्ता ६ वी

## आमचे विषय

मराठीत असतात
लेखक, कवी.
इतिहासात असतात
इसविसन, वंशावळ.
गणितात असते
आकडेवारी.
विज्ञानात असतात
प्रयोग सारे.
भूगोलात असतात
ग्रह तारे.
इंग्रजीत असतात
शब्द सारे.
शिवणात असतात
धागे दोरे.
हिंदीत असतात
गोष्टी गाणी.
चित्रकले असतात
रंग पाणी.
स्काऊट गाईड मधे तर
शिस्त भारी.
योगासनात असतात
आसने सारी.
म्हणून वाटते, एवढे विषय
नको ग बाई.

**करिश्मा मुल्ला**
इयत्ता ७ वी

# तरस

## रणजित गुंजवटे

इयत्ता ७ वी

उन्हाळ्याची सुट्टी होती. मी आणि माझा मित्र आंबे खायला रानात गेलो. माळरानावरील शेतात विहिरीजवळ आंब्याचे झाड होते. आम्हाला लांबूनच दोन पिकलेले आंबे दिसले. आम्ही तेथे पोहोचताच सायकल लावून भराभर झाडावर चढलो व ते दोन आंबे काढले. मागे एक झाड होते. त्याच्या विरुध्द दिशेने आम्ही तोंड करुन आंबे खात बसलो. मी व माझा मित्र बोलण्यात मग्न होतो. अचानक मागच्या झाडावरून पक्षांचा किलबिलाट झाला. कोणता पक्षी आहे हे पाहण्यासाठी मी मागे वळलो. पाहतो तर काय त्या पक्षांकडे तोंड करुन एक तरस उभे होते. मी माझ्या मित्राला हातानेच खुणावले. आम्ही भरभर खाली उतरलो व सायकलपर्यंत पळत गेलो. माझ्या मित्राने व मी विचित्र आवाज काढले. मदतीला कोण मिळते आहे का हे पाहण्यासाठी पाठीमागे वळून पाहिले. पण ज्या वेळी आम्ही वळून पाहिले त्यावेळी तरस मागच्या बांधावरुन पसार झाले होते. ❑



# जांबोरी

## जांबोरी म्हणजे काय?

संचिता निंबाळकर,इयत्ता ८ वी

ब्रिटीश लेफ्टनंट बेडन पॉवेल यांनी स्काऊट गाईडची स्थापना केली. एन.सी.सी. आणि एम.सी.सी. प्रमाणेच स्काऊट गाईड हा एक क्रीडा विषय आहे. मुलांना स्काऊट तर मुलींना गाईड या नावाने संबोधिले जाते. स्काऊट गाईड अंतर्गत मुलांमध्ये शिस्त निर्माण केली जाते. तसेच मुलांच्या कलागुणांना वाव दिला जातो. मुलांना जबाबदार बनविण्यासाठी त्यांचे मेळावे घेतले जातात. स्काऊट गाईड जेव्हा जिल्ह्याच्या ठिकाणी एकत्र येतात त्यास 'जिल्हा-मेळावा' म्हणतात. राज्याच्या ठिकाणी जेव्हा एकत्र येतात त्याला 'जांबोरी' असे म्हणतात. अशी राष्ट्रीय जांबोरी २००५ साली उत्तरांचलमधील हरिद्वार येथे संपन्न झाली. ही राष्ट्रीय जांबोरी एकूण सात दिवसांची होती. कमला निंबकर बालभवनमधील १० गाईड व १० स्काऊट असे २० विद्यार्थी या जांबोरीसाठी निवडले होते. त्यांचे काही अनुभव येथे शब्दांकित केले आहेत. ❑

## मी हाय कोली

गौरी कदम, इयत्ता ८ वी

हरिद्वार जांबोरीला जाण्यासाठी आमची निवड झाली आणि आमच्या डोक्यातील बाकी सर्व विषय पळून गेले. नाच बसविण्यासाठी सातारला जायचे ठरल्यावर तर वर्गात लक्षच लागेना.

आमचा 'मी हाय कोली...' या गाण्यावर नाच बसवला होता. आम्ही महाराष्ट्र राज्यातर्फे हे सादरीकरण करणार होतो. संकपाळ सरांनी आम्हा अडीचशे जणांचा नाच चक्क तीन दिवसात बसवला.

आम्हाला असे वाटत होते की सगळ्यांसारख्या स्टेप्स आपल्याला जमतील का? पण विशेष म्हणजे आमच्यात कधीही नाच न केलेली मुलं मुली सुध्दा नाचली. प्रत्येक शाळेनुसार गट तयार केलेले होते. आमचा कमला निंबकर बालभवन शाळेचा एक गट होता. आमच्या शाळेचा ड्रेस लाल व पांढरा असल्याने तेथील सर आम्हाला लालपेटी म्हणायचे.

आम्हाला कळले होते की हा नाच राष्ट्रपतींसमोर होणार आहे. त्यामुळे प्रत्येकजण सुंदर नाचत होते. नाचामधील एक स्टेप इतकी छान जमायची की ती स्टेप आम्ही करायला लागल्यावर टाळ्यांचा जणूकाही पाऊसच पडायचा. सातारहून आल्यानंतर आम्ही नाचासाठी साहित्य शोधण्यात रमलो. आम्ही रोज शाळेत नाचाचा सराव करत असू. हरिव्दारला गेल्यावर आम्हाला कळले की आमचा नाच राष्ट्रपतींसमोर होणार नाही. कारण राष्ट्रपती फक्त तीनच मिनिटे येणार होते. हे कळल्यावर एखादे फूल जसे कोमेजावे तसे सर्वांचे चेहरे कोमेजले. पण फोकडान्स कॉंपिटिशनसाठी आमचा नाच आहे असे कळल्यावर आम्ही पुन्हा प्रॅक्टिस सुरू केली.

स्पर्धेच्या रात्री आठ वजता मुली काष्टा नेसून व मुले लुंगी नेसून स्पर्धेसाठी गेलो. आमचा नाच चोविसावा होता. रात्र असल्याने सर्वांना थंडी वाजायला लागली. आमचे दात एकमेकांवर आपटत होते.



सगळे जण एकमेकांना चिकटून बसले होते. सर व बाई थंडी घालवण्यासाठी हसवत होते. काही जण तर झोपले होते आणि निम्मे पेंगत होते. सरांनी पटकन त्यांचे फोटो काढले.

आमचा नाचाचा नंबर जवळ आला. फक्त तीन मिनिटात नाच आम्हाला पूर्ण करायचा होता. प्रत्येक राज्याचा नाच झाल्यावर प्रेक्षक त्या त्या राज्याला आरोळ्या देत. आमचा

नंबर आला व अंगची थंडीच पळून गेली. आम्ही सर्वजण स्टेजवर गेलो. पटकन ओळीत थांबलो व लगेचच गाणे सुरू झाले. स्टेजवर जाण्याआधी असे वाटले होते की आपण २५० जण त्या स्टेजवर मावणार का? आम्ही तसेच दाटीवाटीत नाच केला. खालून शिक्षक सुध्दा नाचत होते. आम्हाला प्रोत्साहन देत होते.

आमचा नाच संपला आणि आम्हाला आरोळी दिली गेली, "चांगलं चांगलं लय लय चांगलं.सर्व शिक्षकांच्या व विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद होता. दुसऱ्या राज्यातील शिक्षक सुध्दा आमचे फोटो काढत होते. नंबर तर कळाला नव्हता पण प्रत्येकाला आत्मविश्वास होता की आपलाच नंबर येणार. कारण मी नाचता नाचता पलिकडे नजर टाकली तेव्हा आमच्या सर्वांच्या डोक्यावरच्या टोपल्या व पोरांची वल्ही एकाच दिशेत हालत होती. सर्वांच्या चेहऱ्यावर हास्य होते. आणि खरेच ज्यावेळी महाराष्ट्र राज्याचा पहिला नंबर आल्याचे कळले तेव्हा असे वाटले की आमच्या एका महिन्याच्या कष्टाचे फळ मिळाले. ❑

# कसा केला प्रवास

गौरी कदम, इयत्ता ८ वी

जांबोरीला जाण्याचा दिवस उजाडला. आठ वाजता पालकांसह चौधरी ट्रॅव्हल्स्मधून सातारला गेलो. पावणे अकराला साताऱ्यात पोहचल्यावर आम्ही बाईंचा वाढदिवस साजरा केला. आम्ही केक आणला होता. मेणबत्तीच्या प्रकाशात चमच्याने केक कापला.

मग रेल्वेची वाट पाहात थांबलो. पालक तर आमच्यावर सूचनांचा जणू पाऊसच पाडत होते. प्रत्येक गाडी आली की छातीत धडधड व्हायची. आम्ही जवळ जायला लागलो की सर आम्हाला मागे सारायचे. नंतर रेल्वे स्टेशनवर गोवा निजामुद्दीन ट्रेनचे नाव ऐकले. आणि प्रत्येकाने हलके सामान हातात घेतले. सर्वांनी चढायची घाई केली. पालक सामान आत टाकत होते. खिडकीतून छोट्या बॅगा टाकत होते. आमचे सगळे सामान पालकांनी चुकून दुसऱ्या डब्यात टाकले होते.

काहीजण रडकुंडीला आले होते. एका डब्यातून दुसऱ्या डब्यात सामान न्यावे लागत होते. सगळे घामाघूम झाले होते. आमचे रिझर्व्हेशन केलेल्या डब्यात आम्ही पोहोचलो. बाई प्रत्येकाला सांगत होत्या आमचे रिझर्व्हेशन आहे. आम्ही एका माणसाला उठवायला गेलो. तो इतका चिडला की बस्! तो झोपेत होता. नंतर तो आम्हाला सॉरी म्हटला.

आमच्या जागा व बॅगा मिळेपर्यंत पहाटेचे चार-साडेचार वाजलेलेही कळले नाही. नंतर आम्ही व्यवस्थित बॅगा लावल्या व सगळेजण गाणी ऐकत गप्पा मारत, पत्ते खेळत बसलो. मी दोन रात्री ट्रेनमध्ये काढल्यात याचे मलाच नवल वाटते. खरोखरच हा माझा अविस्मरणीय प्रवास झाला. ❑

## असा होता आमचा तंबू

गौरी कदम, इयत्ता ८ वी

आम्ही हरिद्वारला गेल्यापासून तीन वेळा तंबू बदलला. शेवटी ४८ नंबरच्या तंबूत आलो. तंबू पाहिल्या-पाहिल्याच असे वाटत होते की, 'आपण अकरा जणींना हा पुरणार का?'

तंबूत पूर्ण गवत उगवलेल होते. गेल्या गेल्या तंबूतील गवत काढले. तंबूच्या कडेने चर खोदला व मातीचा लेप लावून सारवून उंचवटा केला. तंबूच्या आतील जागा सपाट करून ताडपत्री टाकली. तंबूच्या कडेचे गवत काढले. तंबूच्या समोरच्या भागात काठ्यांनी कंपाऊंड तयार केले व त्याला पताका लावून सजवले. कडेने काठ्या लावून मध्ये जागा ठेवली व गेट तयार केले. तंबूच्या मागच्या बाजूला आमच्या जागेत गोटे ठेवले व शोषखड्डे तयार केले. साबण वगैरे ठेवण्यासाठी गॅजेटस् बनवली.चप्पल ठेवण्यासाठी दोरी व काठ्यांपासून चप्पलस्टँड बनवले. तंबूच्या मागच्या बाजूला भांडी ठेवण्यासाठी रॅक बनविले. ओल्या व कोरड्या कचऱ्यासाठी खड्डे तयार केले. तंबूच्या मध्ये एक काठी बांधली व त्यावर वाळलेले कपडे ठेवले.तंबूच्या समोरच्या बाजूला आम्ही रोज रांगोळी काढायचो आम्ही रोज सकाळी तंबू तपासला जाई. त्यावेळी सर्वांचा युनिफॉर्म असायचा. पायात बूट व मोजे हवेत. ज्यावेळी तंबू तपासत



असत त्यावेळी आम्ही आमचे सामान बाहेर काढून ठेवत असू व त्यांना सांगत असू की रात्रभर सामान आत असल्याने त्यावरील जंतू उन्हात मरावेत म्हणून ते बाहेर ठेवले आहे. इतर माहिती संघनायक देत असे. शोषखड्डे, गॅजेटस्, मध्यभागी लावलेलीबॅटरी कशासाठी वगैरे माहिती त्यांना सांगावी लागे. तंबूच्या चारही बांजूंनी संघनायक निरीक्षण करीत असत. तंबू आम्हाला घरासारखा वाटत होता व तो आम्ही स्वच्छ ठेवीत होतो. ☐

## रात्र पावसाची

प्रणाली ढमाळ, श्रेया पाटील. इयत्ता ८ वी

नोव्हेंबर महिन्यात आम्ही जांबोरीला गेलो होतो. तिथे आम्ही तंबूत राहत होतो. आम्हाला तंबूत रहायला खूप मजा वाटली.

परंतु एका रात्री पावसाने खूप धमाल उडवून दिली. दिवसभराच्या खेळाने थकून संध्याकाळी तंबूत विसावा घेण्यासाठी आम्ही सगळे पडलो होतो. आणि आपले दिवस-भराचे अनुभव आम्ही बाईंना सांगत होतो. गप्पा मारता मारता झोप कधी लागली कळलेच नाही. मधून मधून ढगांच्या गडगडाटामुळे जाग येत होती. पण त्याच्याकडे दुर्लक्ष करुन आम्ही झोपी गेलो. अचानक वीज कडाडली आणि मला जाग आली.

एकाएकी गार कसे लागू लागले याचा विचार करत होते. विचार करत असतानाच माझ्या तोंडावर पाण्याचे थेंब पडू लागले. वर पाहिले तर मला तंबू भिजलेला दिसला आणि मी ताडकन् उठले. माझ्या शेजारी अंकिता गाढ झोपली होती. मी तिला गदागदा हालवू लागले. ती चिडून उठली आणि काय झाले? काय झाले? असे बरळू लागली. मग मी तिला सांगितले, "पाऊस पडतोय लवकर उठ". आम्ही दोघींनी बाईंना उठवले. बाईंनी बॅटरी घेऊन उजेड केला, सर्वांना उठवले पण कोमल काही झोपेतून उठत नव्हती. कोठे कोठे ओले झाले आहे हे बाईंनी बघितले. आणि सर्वांच्या बॅगा मध्यभागी कोरड्या जागेत ठेवल्या. तंबूच्या दोन्हीबाजूच्या लाकडी काठ्या तळवटास गुंडाळून ठेवल्या. सगळ्यांच्या बॅगा खालपासून वरपर्यंत पाण्याने भिजल्या होत्या. आमचा तंबू उताराला असल्यामुळे जवळ जवळ सगळीकडचे पाणी उताराच्या दिशेने वाहात होते व ते पाणी आमच्या तंबूतून तळवटाखालून चालले होते.

आम्ही बॅगांवरती डोके ठेऊन झोपलो. सकाळी उठून पाहिले तर सर्वत्र चिखल झाला होता. आम्ही तंबूची केलेली सजावट गळून चिखलात पडली होती. आमच्या बॅगांना कुबट कुबट वास येऊ लागला होता. आम्ही बॅगा बाहेर ठेवून सूर्य उगवण्याची वाट पाहू लागलो. ❑

## स्वप्न नव्हे सत्य

कोमल ढगे, इयत्ता ८ वी

रात्र फार झाली होती. उद्या राष्ट्रपती येणार होते. उद्या लवकर उठायचे म्हणून आदल्या दिवशी आम्ही लवकर झोपलो. दुसऱ्या दिवशी एरीनात जायचे म्हणून भरभर आवरले. पण आंघोळ मात्र कुणीच केली नव्हती. तेथे सकाळी फार थंडी असायची आणि त्या थंडीत गार पाण्याने आंघोळ करणे शक्यच नव्हते. त्यामुळे आम्ही आंघोळ न करताच एरीनात जायचे ठरवले. आम्ही पूर्ण गाईडच्या ड्रेसमध्ये होतो. पंधरा

आक्टोबरचा दिवस. आम्ही आनंदात होतो. सगळ्यांच्या तोंडून राष्ट्रपती येणार, राष्ट्रपती येणार! असे उद्‌गार येत होते. आम्ही गेलो तेव्हा आम्हाला महाराष्ट्र राज्यासाठीची जागा शोधावी लागली. अखेर एक फेरा मारला तेव्हा जागा सापडली. राष्ट्रपती येण्यापूर्वी सराव घेणे सुरु झाले. आम्ही फळ्यावंर जाऊन बसलो. तेव्हा माईर्कवर संयोजकांनी राष्ट्रगीत म्हटले. प्रार्थना सुध्दा म्हटल्या. नंतर राष्ट्रपती ज्या राज्यासमोर येतील त्या राज्याने 'हर्ष हर्ष जय जय' असे उद्‌गार काढायचे असे सांगितले. राष्ट्रपती येण्याच्या आधीचा सराव झाला.

काही वेळातच राष्ट्रपती येणार अशी सूचना केली. सर्वत्र शांतता पसरली. हजारो मुलांचा पक्ष्यांप्रमाणे किलबिलाट व्हायचा. तो एकदम एखादया माळरानाप्रमाणे शांत झाला. राष्ट्रपती आले तेव्हा त्यांनी आणि हजारो स्काऊट-गाईड यांनी राष्ट्रगीत व प्रार्थना म्हटली. राष्ट्रपती आपल्या राज्यासमोर आले तेव्हा आपण स्वप्नात आहोत की सत्यात हे समजेना. बाईंनी त्यांचे दोन-चार फोटो काढले. 'हर्ष हर्ष जय जय' असे सर्वांच्या तोंडून उस्फूर्त उद्गार निघत होते. नंतर राष्ट्रपतींनी भाषण केले. प्रत्येक राज्यातल्या विद्यार्थ्यांची त्यांच्यासमोर लोकनृत्ये झाली. त्यात आपल्या महाराष्ट्र राज्याचा सुध्दा सहभाग होता. महाराष्ट्राने त्यांच्या समोर बरछी लोकनृत्य सादर केले. नंतर राष्ट्रपती काही क्षणातच तेथून निघाले. गाडीत बसले आणि गेले.

स्वप्नातही जे नाही बघितले ते सत्यात पहायला मिळाले. जन्माचे सार्थक झाल्यासारखे वाटले.

❑



# हरवलेला कॅमेरा

दिग्विजय कदम

इयत्ता ८ वी

आम्ही फलटणला परत येण्यासाठी आग्र्यातून सायंकाळी ६ वाजता रेल्वेत चढलो. आमचा रेल्वेचा डबा S7 हा होता. पण आम्ही S6 मध्ये चढलो. S6 डबा पार करुन आम्हाला S7 मध्ये जायचे होते. सामानाच्या भाराने आमचा तोल जात होता. कसे तरी आम्ही सामान घेवून तोल सावरत स्वयंपाकघराचा अरुंद रस्ता पार केला आणि S6 मधून S7 मध्ये गेलो व आमचे रेझर्वेशन असलेली जागा धरुन बसलो. तेथे अनेक प्रवासी होते. एक जण झोपले होते. एक जण लहान बाळाशी खेळत तर एक जण वॉकमनमधील गाणी ऐकत बसले होते. मिलिट्रीतील अनेक फौजी त्यात होते. एकेका सीटवर चौघे-चौघेजण बसले होते. एक फौजी अखंड ४ ते ५ तास उभा राहिला होता. तेव्हा मी त्याला बसण्यास जागा दिली व तो माझा मित्र झाला. आपापले सामान मिळेपर्यंत प्रत्येकाचा जीव धाकधुक करत होता. त्यातच अमितचा कॅमेरा हरवला.

सवर्जण काळजीत पडले. अमित सरांजवळ जाऊन सांगू लागला "सर माझा कॅमेरा हरवला आहे." सर देखील घाईगडबडीत असल्याने म्हणाले "असेल इथेच कुठे तरी"

गणेशची टोपी देखील हरवली होती. तो टोपी शोधायला गेला असता त्याला अमितचा कॅमेरा मिळाला. पण इकडे अमितचा कॅमेरा हरवल्याने अमित रडतोय हे त्याला माहीत नव्हते. गणेश कॅमेरा घेवून S 6 मध्येच गप्पा मारत बसला. बाई सर्वांना सांगत फिरत होत्या की अमितचा कॅमेरा हरवलेला आहे. कोणाला सापडला तर अमितला द्या. गणेश म्हणाला, ''बाई कॅमेरा मला सापडलाय." बाईंनी परत येऊन अमितला हे सांगताच तो गणेशकडे धावत गेला. त्याचा कॅमेरा त्याला मिळाला. रडता रडता, डोळे पुसता पुसता अमित हसू लागला. त्याला हसताना पाहून सर्वजण हसू लागले. हसता हसता सर्वजण एकमेकांच्या अंगावर झोपी गेले. ❑

# गंगातीरी

गणेश कदम

इयत्ता ८ वी

आम्ही हरिद्वारला गंगा नदीच्या किनारी रहात होतो. मी जांबोरीला जाण्याआधी 'गंगेत प्रेते वाहतात' असे ऐकले होते. आम्ही आधीच गंगेत दोन अर्धवट जळकी प्रेते पाहिली होती. जरी आम्ही बाहेरून खंबीर वाटत असलो तरी मनातून मात्र फार भ्यायलो होतो.

एके दिवशी रात्री आम्ही तंबू सजावटीसाठी कोरड्या पात्रातून गोटे आणायला गेलो . मी आपला माझ्याच नादात पुढे चाललो होतो. मागे विराज व दिग्विजय हळू हळू गप्पा मारत येत होते. मी एका ठिकाणी थांबून गोटे गोळा करू लागलो. वळून पाहतो तर मागच्या मागे दिग्विजय व विराज पळू लागलेले दिसले. मी पण मागे पळू लागलो. थोडे पुढे गेल्यावर मी त्यांना त्यांच्या पळण्याचे कारण विचारू लागलो. ते म्हणाले ,"तू ज्या ठिकाणी गोटे गोळा करत होतास तेथे मागे प्रेत होते." मग मात्र मी पण घावरलो. आम्ही घावरतच तंबूत आलो. तेथे सर्वांना घडलेला प्रकार सांगितला. सर्वजण बॅटऱ्या घेऊन म्हणाले, 'चला बघून येऊया.' सर्वांनी तेथे बॅटरीचा प्रकाश झोत पाडला. काही जण भितीने लांबच थांबले होते. सर्वजण आपापल्या तऱ्हेने तर्क लावत होते. कोणी म्हणत होते, "ते बघ हात कसा लोंबतोय." तर कोणी म्हणत होते, "हे नक्कीच भुताखेताचे काम आहे." आम्ही सर्वजण भीत भीत तंबूत आलो. सर्वजण निरनिराळे तर्क- वितर्क करत होते. कोणी भीतीने मधेच ओरडत होते. सर देखील तंबूत नव्हते. मुले एकमेकांना भीती दाखवत होती आणि अशातच कधी झोप लागली ते कळालेच नाही.

सकाळी आम्ही सर्व मुले फिरायला गेलो. तेथे आम्ही फिरत फिरत रात्रीच्या प्रेतापाशी गेलो. पाहतो तर काय तेथे प्रेत नसून चक्क कचऱ्याचा ढीग होता. आम्ही ज्याला हात म्हणत होतो ती तर एका शर्टाची बाही होती.

❑

## गरूड झेप . . .



पाहिले मी गरूडाला झेप घेताना आकाशी
पाय खिळले जमिनीला पण मन धावे गरूडापाशी
विचारले मी त्याला इतका उंच तू कसा जाशी?
काही न बोलता गेला वर तो मंदहास्यानिशी !
त्याला पाहून मी मात्र ठरविले घेईन भरारी अशी
त्या खगाहूनही उंच जाऊन होईन एकदा दिसेनाशी

**प्राजक्ता पाटणकर**
इयत्ता ९ वी

**(पिल्लूडी पान ९ वरून)**

मी त्याला भात खायला घालायची. नंतर ९ वाजले की त्याला बागेतली गांडुळे आणून द्यायची. मी त्याचे नाव ठेवले पिल्लूडी. ते तसे फारच वेडे आणि थोडे नाराज दिसायचे. त्याला मी पायऱ्यांवरुन उड्या मारायला शिकवले. यातूनच ते थोडे-थोडे उडायला शिकले. आता ते थोडे मोठे झाले होते. ते आता सगळीकडे उड्या मारायचे. माझे बाबा तर त्याला दुपारी कुशीत घेऊन झोपायचे. एकदा मी त्याला गॅलरीमध्ये मोकळे सोडले. काही कामासाठी मी आत गेले व नंतर बाहेर आले आणि पहाते तर काय,बाहेर पिल्लूडी नाही. मी घाबरले. त्याचे काही बरेवाईट तर नसेल ना झाले असे मला वाटले. मी पळत पळत खाली आले. पाहते तर ते आजीच्या खांद्यावर खेळत होते. ते पाहून मला खूप आनंद झाला. मला वाटू लागले की आता ते आजीलाही आवडायला लागले आहे. आजी म्हणाली, "याला तर उडता येतेय ते वरुन इथे आले या झोपाळ्यावर."

हळू हळू ते पिल्लू आपल्या आपण गांडुळे खाऊ लागले. एक दिवस पिल्लूडी गांडूळ खात असताना दोन बुलबुल तेथे आले. पिल्लूडी त्यांच्या बरोबर या फांदीवरून त्या फांदीवर उड्या मारू लागले. आणि बघता बघता भुर्रकन उडून गेले. ❑


# खेळण्यांच्या दुनियेत

विश्वजीत सांगळे

इयत्ता ४ थी

रविवारचा दिवस म्हणून मी खूप खेळलो. संध्याकाळ झाली होती. आईने मला बोलावले. मी घरी आलो. हात पाय धुतले आणि अभ्यास केला. जेवलो व झोपी गेलो. जास्त खेळल्यामुळे गाढ झोपी गेलो. पण अचानक खिडकीचे पडदे हलायला लागले. गार हवा सुटली. पाऊस यायला लागला.ढगांचा आवाज आला. कुत्री ओरडायला लागली. पक्षी पण ओरडू लागले. मी कान देऊन ऐकले तर वटवाघूळ ओरडत होते. मी खिडकीपाशी गेलो व बघू लागलो. बाभळीच्या झाडावर तीन आकृत्या नाचताहेत हे बघून मी मागे सरकलो आणि कपाटाला धडकलो बघतो

(पान नं ३७ वर )



# नाम्याची गोष्ट

## ओमप्रकाश धुमाळ

इयत्ता ६ वी

रणरणते ऊन. जणू काही सूर्य आगीच्या ज्वालाच फेकत आहे. कुठे झाड नाही. पान नाही. फूल-फळ तर लांबच. झाडे होती. पण ती अशी बोडकी. या धरतीवर कधी हिरवळ पसरेल काय याचा विचार नाम्या करत होता. उन्हाळ्याचे दिवस. अंगातून घामाच्या धारा निघत होत्या. तेवढ्यात त्याच्या कानावर हाक पडली, "नाम्या घरी चल. आयनं बोलावलया." ही त्याची बहिण चिंगी. तीही अशीच उनाडकी.

आईने नाम्याला पाणी आणायला लावले. घराजवळ पाण्याची एकही विहीर नव्हती. नाम्याने कळशी उचलली व तो निघाला. पायात चप्पल नाही. अंगावर नीटसे कपडे नाहीत. त्याला समोर काहीतरी दिसले. नाम्याप्रमाणेच रणरणत्या उन्हात उनाडक्या करीत होते. नाम्याने नीट पाहिले तर ते माकड होते. माकड जवळ आले. नाम्या पाण्याच्या शोधात चालला होता. माकड पण त्याच्याच मागे. नाम्याने विचारले तर चिंगी म्हणाली, "आरं दादा, आपल्या हितं काम मिळत नाय. म्हणून तालुक्याच्या गावी जायचं." नाम्या म्हणाला, " आन् मंग माजी शाळा?" "व्हय! लय शाळा शिकून धन लावणार हाय. चल उचल बोचकं आन् लाग रस्त्याला." नाम्या व माकड बाबांच्या मागे पायपीट करायला लागले. नाम्याने गावाकडे वळून बघितले. पडक्या झोपड्या व बोडकी झाडे यांचे गाव !

रस्तावद्रन उडणारा फुफाटा त्याला गावची याद करून देत होता. पण गाव तर दुष्काळग्रस्त ! प्यायला धड पाणी पण नाही. सर्वजण तालुक्याच्या गावी पलायन करीत होते. एक बारा वर्षाचा मुलगा व एक माकड माणसांच्या घेळख्यातून चालले होते. शहराबाहेर मुक्काम मोडला. वाळलेली भाकरी चघळत नाम्या शहरातील इमारतींकडे पहात होता. थोड्याच वेळाने शहरात काम शोधत सर्वजण जाणार होते ज. नाम्याच्या व माकडाच्या उनाडक्या चालल्या

होत्या. बाबाने त्यांना झाडाखाली गप्प बसायला सांगितले होते.

बाबा इतर मोठ्या माणसांबरोबर निघून गेले. नाम्या माकडांसंगे बोलत बसे. माकड नाम्या जे म्हणेल ते ऐकत असे. माकड व नाम्या यांचा खेळ पाहण्यासाठी मुले जमत होती. एका मुलाने विचारले ," ए मुला आमच्या शाळेत येशील का वे ?" नाम्या म्हणाला,"चालेल."

दसऱ्या दिवशी सकाळीच नाम्या शाळेत गेला. ही शाळा जरा मोठीच होती. शाळा त्याला खूपच आवडली. त्याने माकडाचे खूप छान छान खेळ केले. पण शाळेच्या मुख्याध्यापकांना ते आवडले नाही. त्यांनी सांगितले,"हे असे करणे चुकीचे आहे. याला तू सोडून दयायला हवे. तू आमच्या शाळेत शिकायला ये. याला आपण जंगलात सोडून देऊ." पण माकडावर नाम्याचे खूप प्रेम होते. त्याला माकडाला सोडायचे नव्हते.पण नाईलाजाने त्याला ते करावेच लागले. त्याचे वडील आधी शाळेत पाठवायला तयार नव्हते. पण शिक्षकांनी बाबांनी समजूत काढून त्याला शाळेत घालावयास सांगितले.

नाम्या शालेत जाऊ लागला. पण आता त्याला त्याचे माकड मिळणार नव्हते. नाम्याबरोबर चिंगीही शिकू लागली. माकडाचया आठवणीने नाम्या खंत करीत होता. बापाला काम लागले आणि नाम्या आठवण जवळ ठेऊन जीवन सुखासमाधानाने जगू लागला.

❑



# लांडगी

## मिलिंद अहिवळे

इयत्ता ६ वी

एका माळरानावर एक सुंदर दरी होती. ती प्रचंड खोल होती. त्या दरीत खूपशा कपारी होत्या. तिथले सगळे गवत माणसांनी जाळले होते. कोणताही प्राणी दिसत नव्हता. ना उंदीर ना पक्षी. तिथे काहीच नव्हते. पण त्याच कपारीत एका लांडगीची चांगली चार-पाच पिल्ले होती. लांडगी रोज काहीतरी आणून पिलांना खायला देत असे. कधी काही मिळाले नाही की ती एकदम सावधगिरीने जवळच्या खेड्यातल्या धनगराची मेंढी किंवा शेळी मारुन आणत असे. आणि पिलांना खायला देत असे. ती दरी वनखात्याच्या ताब्यात होती. तिथे छोटी-छोटी बाभळीची झाडे होती. बाकी सारे ओसाड होते. दरीच्या खाली दगडे रचली होती. असे हे सगळे सामसूम माळरान होते.

एके दिवशी २-३ बायका सरपण तोडायला फॉरिस्टच्या दिशेने आल्या. एक बाई कपारीकडे गेली. तिला लांडगीची पिल्ले दिसली. तिथे लांडगी नव्हती. त्या बाईने इतरांना सांगितले. त्या म्हणाल्या चला इथून लांडगी आल्यावर आपल्याला मारुन टाकेल. तिघीजणी गावात पळतच गेल्या.

गावात १५-१६ घरे होती. त्यात ४०-५० माणसे. २०-२५ मुले गोट्या खेळत होती. म्हातारे लोक पत्ते खेळत होते. बायका झोपडीत बसून भाकऱ्या थापत होत्या. म्हाताऱ्या बायका बाळांना मांडीवर घेऊन झोपवत होत्या. इतक्यात तिघीजणी सगळ्या गावाला ओरडून सांगू लागल्या. "लांडगीची पिले सापडली. चला आपण त्यांना मारुन टाकू". सर्व लोक मशाली घेऊन कपारीकडे गेले. त्या बाईने पिल्ले दाखविली. सर्वांनी मिळून कपारीच्या तोंडाशी दगड रचून धूर केला. सगळे झाल्यावर लोक निघून गेले. लांडगीला धुराचा वास आला. लांडगी वास घेत घेत आली. बघते तर काय कपारीच्या तोंडाशी दगड रचलेले. सगळीकडे धूर झाला होता. लांडगी आपल्या पंजाने दगड काढू लागली. तिच्या पायाला कापत


होते. त्याकडे दुर्लक्ष करुन ती दगड काढत होती. एकदाचे दगड निघाले. पिल्ले खाली बेशुध्द पडली होती. तिने पिलांना चाटून उठवले. पण एक पिल्लू मेले होते. त्यामुळे लांडगी वेडीपिशी झाली. लांडगी आपल्या पिल्लांना खायला आणायला गेली. तिला काहीच मिळाले नाही. ती एका झुडपात विश्रांतीसाठी बसली होती. तिथे दोन बायका आल्या. त्यांना हा सगळा प्रकार माहीत नव्हता. बायका चपलांचा, कोयत्यांचा आवाज करत आल्या. जिथे लांडगी बसलेली होती तिथे त्यांच्यापैकी एकजण गेली. तिला लांडगी दिसली नाही ती बाई ते झुडूप तोडत होती. पण लांडगीला वाटले, ही बाईआपल्याला मारेल. लांडगीने बाईवर हल्ला केला. बाईनेही लांडगीच्या डोक्यावर विळ्याचा फटका मारला.लांडगीचा एक डोळा फुटला. ती घाबरून पळून गेली. बाईने गावात जाऊन सगळे सांगितले. लोकांना खूप राग आला. लोक विळे, काठ्या दगडी घेऊन लांडगीला शोधू लागले. लांडगी तर लवकर सापडली नाही. तरीही लोक शोध घेत होते. एकदाची लांडगी सापडली. लांडगी भीतीने पळू लागली. लोक तिचा पाठलाग करु लागले. एका माणसाने लांडगीच्या पायावर दगड मारला. लांडगी खाली पडली. लोकांनी काठ्यांनी, कोयत्यांनी, दगडांनी ठेचून मारले. तिची पिल्लेही भुकेने मरुन गेली.

दुसऱ्या दिवशी पेपरला बातमी आली. पिसाळलेल्या लांडगीला लोकांनी न घाबरता ठेचून ठेचून मारले.

❑



# या जगात जन्मायचय मला!



हे सुंदर जग, हा रम्य निसर्ग
पहायचाय मला.
या जगात जन्मायचय मला.

खूप-खूप शिकून यशाचे शिखर
गाठायचय मला.
आई-बाबांचे नांव,
उंचवायचय मला.
या जगात जन्मायचय मला.

पण हेच आई-बाबा
मला जीवन द्यायला तयार नाहीत
कारण मी एक मुलगी आहे.
चूल आणि मूल एवढच आमचं जगणं का?
हुंडाबळीसाठी फक्त आमचं मरण च का?
म्हणून मानाने जगायचंय मला.



स्वतःच्या पायावर उभं राहायचंय मला.
खडतर जीवनातून यशाची वाट काढायचीय मला.
म्हणूनच या जगात जन्मयाचंय मला.



**मिनल चव्हाण**
इयत्ता - ७ वी

# अभ्यास मित्र बनला

पुष्कीन साळुंखे
इयत्ता ५ वी

असेच एक गाव होते. छोटेसेच होते पण तिथले लोक खूप चांगले होते. त्यांचा स्वभाव प्रेमळ व परोपकारी होता. त्या गावात बहुतेक लोक शेती करायचे. त्या गावात एक मुलगा रहात होता. त्याचे नाव होते राजू. राजू सहावीत होता. पण तो अभ्यासात कमी पडायचा. तो अभ्यास मन लावून करतच नव्हता. सारखा अभ्यास करताना इकडे-तिकडे बघायचा. आई-बाबा त्याला सारखे सांगत की, मन लावून अभ्यास कर. अभ्यास करताना बाकीच्या गोष्टी मनात आणू नकोस. पण राजूला कळायचे नाही की मन लावून अभ्यास करणे म्हणजे काय? तो आई-बाबांचे बोलणे एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून देत होता. शिक्षक वर्गात सांगायचे की, नुसते पाठांतर करून उपयोग नाही. आपले कान आणि डोळे आपण नेहमी उघडे ठेवले पाहिजेत. आपण माहिती मिळवली पाहिजे. आपल्यात जिज्ञासा पाहिजे. पण राजू तसे करत नव्हता.

चाचणी आली. तरी राजू अभ्यास नीट करत नव्हता. त्याने वहीतल्या प्रश्नांची उत्तरे पाठ केली. राजू परीक्षेला गेला पण त्याला पेपर सोडवताच येईना. कारण पाठ केलेली उत्तरे तो विसरत होता. परीक्षा संपली. शाळा सुरू झाली. निकाल लागले.



राजू शाळेत गेला. प्रगतीपत्रक मिळाली. राजूच्या वर्गातील सर्व मुले पास झाली. पण एकटा राजू नापास झाला. तेव्हा कांबळे सर त्याला म्हणाले, "तू उद्यापासून शाळा सुटल्यावर माझ्याजवळ थांबत जा. मी तुला अभ्यास करण्याच्या

वेगवेगळ्या पध्दती शिकवीन आणि त्याप्रमाणे अभ्यास घेईन". राजू बरे म्हणाला आणि शाळा सुटल्यावर घरी गेला. त्याने आईला विचारले, "आई, मी नेहमी परीक्षेत नापास का होतो?" तेव्हा आई म्हणाली," राजू तू मन लावून अभ्यास करत नाहीस, आजूबाजूची माहिती मिळवीत नाहीस, शब्दांचे अर्थ समजावून घेत नाहीस. सारखे फक्त पाठांतर करतोस. त्यामुळे तुला परीक्षेत कमी मार्क पडतात."

राजू दुसऱ्या दिवसापासून शाळा सुटल्यावर कांबळे सरांकडे थांबू लागला. त्याने आईला मी रोज शाळा सुटल्यावर घरी उशीरा येईन. असे सांगितले होते. कांबळे सरांनी पहिल्या दिवशी त्याला गणिताची कोडी घालून ती सोडवायला सांगितली. राजूने ती व्यवस्थित सोडवली. मग सरांनी त्याला नकाशातील ठिकाणे सांगून ती शोधायला सांगितली. त्यामुळे राजूला कुठले ठिकाण कोणत्या दिशेला आहे ते कळले नंतर सरांनी त्याला धड्यांवरचे प्रश्न काढायला सांगितले आणि म्हणाले,"बघू तुला किती प्रश्न काढता येत आहेत." मग सरांनी त्याला विज्ञानाचे काही प्रयोग करून दाखवले व त्याला ते करायला सांगितले. राजूने ते काळजीपूर्वक केले. नंतर सरांनी त्याला वेगवेगळ्या झाडांची पाने गोळा करायला सांगितली आणि त्यांची नावे विज्ञानाच्या शब्दकोशातून शोधायला सांगितली. राजूने सगळ्या पानांची नावे शोधली. त्यामुळे त्याला झाडांची चांगलीच ओळख झाली. मग सरांनी त्याला काही शब्द दिले आणि त्या शब्दांपासून कविता करायला सांगितल्या. राजूने छान कविता केल्या. नंतर ते इंग्रजी शब्दांच्या भेंड्या खेळले. त्यामुळे राजूला इंग्रजी शब्द आणि त्यांचे अर्थ समजले. मग त्यांनी



दुर्बिणीतून ग्रह आणि तारे यांचे निरीक्षण केले आणि ताऱ्यांची बरीच माहिती गोळा केली. ते असेच रोज वेगवेगळ्या पध्दतींनी अभ्यास करु लागले. एके दिवशी राजू अभ्यास करत असताना त्याची आई तिथे

आली. ती आश्चर्यचकीत झाली आणि म्हणाली, "अरे, मी तुला असा मन लावून अभ्यास करताना कधीच बघितले नाही. एकदमच तुझ्यात हा बदल कसा काय झाला?" तेव्हा राजूने तो रोज संध्याकाळी शाळेत का थांबत होता आणि कसा अभ्यास करत होता हे सांगितले. आई म्हणाली, "छान, असेच रोज कांबळे सरांकडे जात जा. त्यांचा तास कधीही बुडवू नकोस."

आता राजू चांगला अभ्यास करू लागला होता. अभ्यास त्याचा मित्र बनला होता. त्याच्यात जिज्ञासा निर्माण झाली. तो सतत शिक्षकांना आणि आई-बाबांना प्रश्न विचारून माहिती मिळवू लागला. तो पुस्तकेही वाचू लागला. त्यामुळे त्याचा अभ्यास सुधारला आणि वार्षिक परीक्षेत तो चांगल्या मार्कांनी पास झाला. ❑

## स्त्री

स्त्रीचं मरण म्हणजे
जग अंधारमय होणं

स्त्रीचं जगणं म्हणजे
जग प्रकाशमय होणं

स्त्री म्हणजे वादळात
अडकलेली होडी

स्त्री म्हणजे अदभूत
अशी कोणी

स्त्री म्हणजे आहे
सत्याचा प्रकाश

स्त्री म्हणजे आहे
जीवनाचा श्वास

स्त्री म्हणजे कसं सांगू?
कारण मीही एक स्त्रीच
नशिबानेच आहे
मी सुध्दा तीच


**श्रध्दा कुलकर्णी**
इयत्ता ९ वी

# ती भयाण रात्र

## सूरज चौधरी

इयत्ता ९ वी

ती भयानक रात्र आजही मला स्पष्टपणे आठवते. मी कधीही विसरु शकणार नाही अशी रात्र. एक अशी रात्र जिच्या आठवणीनेच अंगावर शहारे येतात. तेव्हा मी आठवीत होतो. उन्हाळ्याची सुट्टी लागली होती. आणि मी माझ्या वडिलांबरोबर दोन दिवसांसाठी आमच्या शेतात गेलो होतो. आमचे शेत विंचुर्णीच्या तलावाजवळ होते. तेथे एका साधूचे घर होते आणि एक मोडकळीला आलेले 'छप्पर' होते. घरापासून जवळच तलाव होता. तलावाच्या मध्यभागी एखाद्या बेटाप्रमाणे दिसणारी थोडीशी जमीन होती. आणि तेथे एकही पान नसलेले भुताच्या घराप्रमाणे वाटणारे एक झाड होते. तेथील लोक आमच्या घराजवळ भुतांचा वावर आहे अशा कथा सांगत. गावापासून घर थोडेसे लांब असल्याने व भुतांच्या भीतीने सहसा तिथे कोणी येत नव्हते. आमच्या रानात ऊस लावला होता. व तलावाच्या पलिकडच्या गर्द झाडीत कोल्ह्यांचे टोळके होते. ती कोल्हीरात्रीची जोरात



कोल्हेकुई करत आणि आमच्या शेतात येऊन नासधूस करत.

त्या रात्री मी झोपायची तयारी करत होतो. रात्री अकरा साडे अकराची ची वेळ होती. अचानक वीजपुरवठा बंद झाला. उन्हाळ्याचे दिवस असल्याने आणि खूप उकडत असल्याने मी माझे अंथरुण घेऊन बाहेर झोपायला आलो. अंगातला शर्ट काढला व इकडे तिकडे बघत गार हवा घेत बसलो. ती रात्र बहुतेक पौर्णिमेनंतरची होती. चंद्र लालबुंद दिसत होता. त्याचे चांदणेही मंद होते. जवळ-जवळ मध्यरात्र झालेली होती. सर्वत्र स्मशान शांतता होती. तेवढ्यात मला शेताच्या दिशेकडून कोल्हेकुई ऐकू आली. मी थोडासा दचकलो. माझे वडील मोटारीत झालेला बिघाड पाहण्यासाठी एका मोटार मेकॅनिकबरोबर विहिरीवर गेले होते. त्यांना रात्री ऊसाला पाणी द्यायचे होते. कोल्ही शेतात नासधूस करतील म्हणून त्यांना हाकलायला मीच शेताकडे जाण्याचे ठरवले.

वडिलांनी बॅटरी नेली होती माझ्याकडे काही दुसरी बॅटरी नव्हती. शेवटी एक हातभार लांब व चांगली जाड काठी घेऊन मी निघालो. सर्वत्र अंधार होता. वारा सुटलेला. फक्त पानांच्या सळसळण्याचा आणि मधूनच कोल्ह्यांचा आवाज येत होता. भुताटकीचे वातावरण होते. पण मी घाबरायचे नाही असे ठरवले. शेताजवळच्या गवतात साप सळसळल्यासारखा आवाज झाला. मी जोराने काठी जमिनीवर आपटली. आवाज बंद झाला. तसेच कोल्ह्यांनाही माझी चाहूल लागलेली असावी कारण तेही शांत झाले. मी शेतातील पाटावरुन आत घुसू लागलो. कोणीतरी माझ्या मागे येत असल्याचा भास झाला. आता मात्र मी जाम घाबरलो. नक्कीच माझ्या मागे भूत होते. मी जोरात मागे वळलो व ऊसावर काठी आपटू लागलो. भीती कमी करण्यासाठी मनातल्या मनात गाणी म्हणू लागलो. तेवढ्यात मागून कोणीतरी पळत गेल्यासारखा आवाज झाला. मी त्या आवाजाच्या दिशेने पाहिले. तेवढ्यात माझे लक्ष तिथे उमटलेल्या कोल्ह्याच्या पायाच्या ठशांकडे गेले. मी आवाजाच्या दिशेने पाठलाग करू लागलो. प्रत्येक पावलाबरोबर माझी भीती वाढत होती. अचानक आवाज बंद झाला. मी आजूबाजूला पाहिले. मी शेतातून जवळजवळ पलिकडेआलो होतो. फक्त समोरच्या

पाटापर्यंतच आमचे शेत होते व त्यापासून थोडा पुढे तलाव होता. मी शेतातून बाहेर निघणार तेवढ्यात तलावाच्या पाण्याचा आवाज झाला. मी शेताच्या बाहेर आलो. तलावाकडे पाहिले पण काहीच नव्हते. मला वाटले मी भुताच्या जाळ्यात फसतोय. तेवढ्यात पाय घासल्याचा आवाज झाला. मी माझ्या डाव्या हाताला पाहिले. पाहतो तर चार कोल्ही एका रानडुकराच्या मेजवानीवर ताव मारत होती. त्यांनी मी वळल्याबरोबर माझ्याकडे पाहिले. त्यांचे डोळे चमकले, रक्ताने भरलेले लाल दात दिसले. त्यांच्या तोंडातून रक्त गळत होते. ते माझ्याकडे चिडून पाहत होते. मला ते रानकुत्र्यांसारखे वाटले. त्याच वेळेस तलावातल्या बेटावरुन कोल्हेकुई ऐकू आली. माझे लक्ष त्या निष्पर्ण झाडाकडे गेले. तलावात पाणी कमी होते. त्यातून कोणीतरी चालण्याचा आवाज येत होता. भूतच माझ्याकडे येत होते. रानडुक्कर खाणारी रानकुत्रीच होती. अशा वेळेस मी डोळे झाकले. आता मी संपलो असे म्हणत होतो. तेवढ्यात दातावर दात आपटल्यासारखा आवाज झाला. आता माझे काही खरे नव्हते.

अचानक सर्वत्र शांतता पसरली. काय झाले हे पाहण्यासाठी मी डोळे उघडले तेव्हा मी दचकून जागा झालो. सूर्याची पहिली किरणे डोळ्यावर पडत होती.

❑

---

**(खेळण्यांच्या दुनियेत पान २६ वरून)**
तर माझी खेळणी चालायला लागली. मोठ्यादा ओरडायला लागली. माझ्या बोटा एवढी खेळणी मोठी झालेली होती. मी पांघरुणात गेलो. माझे हात पाय थरथरु लागले. बाहुली माझ्या पोटावर बसली. ती मला जोरात मारत होती. मी तिला बाजूला फेकले पण ती चालत चालत खुर्चीत जाऊन बसली. माझेकुत्रे हाड घेऊन नाचत होते व बाहुलीला मोठे दात आले होते. मी घाबरुन गच्चीत गेलो तर सर्व डॉग खेळणी चाल करुन आली व मला गच्चीतून उचलून फेकून दिले. मी ओरडत खाली पडलो. आईने माझ्या तोंडावर पाणी शिंपडले आणि म्हणाली काय बडबडतोस? मग मला कळले की हे स्वप्न होते.

❑

# मी स्वयंपाक शिकते

नम्रता मगर

इयत्ता ८ वी

गेल्या वर्षी मे महिन्याची सुट्टी लागली होती. सुट्टी म्हणजे धमाल नि मजा! माझी सुट्टी मात्र मला स्वयंपाकघर बिघडवण्यात घालवावी लागली. त्याचे असे झाले की आईने मला स्वयंपाक करायला शीक असे सांगितले. तिचा निर्णय अगदी ठाम असतो. त्यामुळे तिच्यापुढे माझी मात्रा चालली नाही.

दुसऱ्या दिवशी मी मुद्दामच खूप उशीरा उठले. हेतू हा की तोपर्यंत आईने स्वयंपाक केला असेल असे वाटले. पण आईलाही सुट्टी होती त्यामुळे अजिबात घाई-गडबड नव्हती. त्यामुळे मी नाराज झाले. मला वाटले विसरली असेल तर छानच होईल पण दात घासतानाच लौकर आटपून स्वयंपाकघरात ये अशी सूचना मिळाली. मग काय जावेच लागले.

"तिथले दोन-तीन कांदे चीर" असे आईने सांगितले, नक्की दोन की तीन काही कळेना म्हणून पाच घेतले. कधी हातात सुरी न घेतलेली मी. सुरी घेतली आणि कांदे चिरायला बसले. पहिला कांदा चिरायला घेताच पावसाच्या सरींपेक्षा दुप्पट वेगाने थेंब पडू लागले आणि नाकातून वाहणाऱ्या पाण्याला सूं सूं करत थांबवता थांबवता माझी तारांबळ उडाली. माझी गडबड पाहून राहू देत असे आई म्हणाली. मला वाटले आता सुटका झाली.

पण छे! आईने हिरव्या मिरच्या चिरायला सांगितले. मी एक मिरची घेऊन त्याच्यातील बिया काढून टाकून दिल्या. आई बघणार एवढ्यात माझा भाऊ ओंकार मला मारुन जाऊ लागला आणि माझा हात चुकून त्याच्या डोळ्यात गेला. तो थयाथया नाचू लागला. मला काय झाले ते समजलेच नाही. आईने पटकन त्याचे डोळे धुतले व "एवढं साधं कळत नाही का? बर लसूण सोल" असे सांगितले.मी लसूण घेतला व त्याच्या पाकळ्या सोलू लागले. पाकळ्या वेगळ्या काढून काढून माझी नखे लाल लाल झाली. मी आता फारच वैतागले होते. घरात सुट्टीसाठी गावाहून

आलेल्या भावंडांचा पत्त्याचा डाव रंगात आला होता आणि मी मात्र एका कैदेत बसले आहे असे वाटू लागले.

मी काम नीट केल्याशिवाय आई मला खेळायला सोडणार नाही हे मला माहीत होते. म्हणून लसूण नीट सोलू लागले. तेवढ्यात कोणीतरी पाहुणे आले आणि मला आनंद झाला. माझ्या सुटकेचा एक आशेचा किरण मला दिसला. पण आईने मला पाणी नेऊन देण्यास सांगितले. मी लसणाचा हात न धुताच तसेच पाणी नेऊन दिले. ते पाहुणे लसणाचा वास घेऊन पाणी प्यायले नाहीत हे बरे झाले. परंतु माठाजवळ लसणाचा उग्र वास घुटमळू लागला. काय झाले हे लक्षात येताच आईने पाणी ओतून दिले. म्हणाली "लक्ष दे. त्या शिवाय सोडणार नाही." झाले! आशेचा किरण निघून गेला. मी निमूटपणे वटहुकुमाप्रमाणे वेलदोडे सोलू लागले. मिरचीच्या अनुभवामुळे मी त्याची फोलपटे केरात टाकली व दाणे साखरेत घातले. आता मात्र अगदी हद्द झाली होती. तिने मला चांगलेच फैलावर घेतले. मला वाटले वैतागून आता तरी ती सोडील कारण तिच्या सुसज्ज स्वयंपाकाघराची मी नासधूस करत चालले होते. मात्र ती अगदी जिद्दीलाच पेटली होती जणू.मला तांदूळ निवडण्यास सांगितले ते मात्र मी नीट निवडले. डब्ब्यात टाकून आई सांगेल त्याप्रमाणे पाणी ओतू लागले. मग आईच्या मार्गदर्शनाखाली कुकर लावला. "उद्या तुझा तू लावायचा" आईने फर्मावले.

दुसऱ्या दिवशी मी नीट तांदळ, डाळ निवडून मापात पाणी ओतून कुकरमध्ये डबे ठेवले. आणि कुकर गॅसवर ठेवला. मात्र मी खाली कुकरमध्ये पाणीच घातले नव्हते. मी मूर्खाप्रमाणे शिट्ट्यांची वाट बघू लागले. पण खूप वेळ झाला तरी शिट्ट्या होईनात. मी आपली कंटाळून गोष्टीचे पुस्तक वाचण्यात मग्न झाले. काही वेळाने कसलातरी वास मला आला. पाहते तर काय निम्मा-अर्धा कुकर करपून कोळसा झाला होता. तेवढ्यात आईलाही करपल्याच्या वास येऊन हातातले वर्तमानपत्र टाकून आई हॉलमधून पळत आली आणि गॅस विझवला. आईचे डोळे पाहून आई मला जमदग्नीचा अवतार भासू लागली.

आता मला कणिक मळायला लावून ती केसकर काकूंनी हाक का मारली तिकडे गेली. मला आईने काल अगदी जीव ओतून कणिक मळायला शिकवली होती. मात्र निम्मे अर्धे पीठ

माझ्या हाताला तोंडाला आणि उरले सुरले जमिनीवर विखुरले होते. तेल घेण्याच्या नादात तेल निम्मे जमिनीवर व अर्धे परातीत झाले होते आणि त्यातच मीठ एकत्र झाले होते. माझा तो अवतार बघून आई रागाने तप्त झाली. भट्टीसुध्दा कमी तापेल एवढी आई चिडली होती. ते पाहून मी सर्व तेथेच टाकून पळू लागले. पण पाय परातीत पडला आणि आईने एवढ्या कष्टाने कालच घासलेल्या फरशीवर तेल आणि पीठ पसरले आणि स्वयंपाकघर चिकट झाले.

आई माझ्यामागे येते आहे ते पाहून किचनचे दार ओढायला गेले तोच तिथला माठ खळकन खाली पडून फुटला. आपण आईला किती मदत करतो हे दाखविण्यासाठी आणि मला मार बसविण्यासाठी अक्षता तिकडून आली आणि पाण्यावर पाय घसरुन जोरात आपटली. आई तिच्याकडे धावली आणि माझी सुटका झाली. त्या दिवसापासून तिने मला कधी स्वयंपाक कर असे सांगितले नाही. आता पाहू या सुटीत काय होते ते! ❑



# जे होते ते भल्यासाठीच...

प्राजक्ता पाटणकर

इयत्ता ९ वी

उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मी वाजेगावला गेले असताना भाऊ साताऱ्याहून दहावीची परीक्षा देऊन नुकताच घरी आला होता. एकदा आम्ही सर्वजण रात्री अंगणात बसलो होतो, तेव्हा त्याने दहावीचा एक किस्सा आम्हाला सांगितला. तो किस्सा त्याच्याच शब्दात मी लिहीत आहे —

माझी दहावीची परीक्षा जवळ आली होती. एके दिवशी आमच्या दहावीच्या वर्गाचा 'निरोप समारंभ' होता. तेव्हा मी शाळेबद्दल शिक्षकांबद्दल जे सांगितले ते शिक्षकांना खूप आवडले. त्यामुळे एका सरांनी मला पुढच्याच आठवड्यात होणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेत भाग घेण्याचा आग्रह केला. मला काही जायचे नव्हते. पण नाइलाजास्तव गेलो.

सकाळी नऊ वाजता गेलो. ते संध्याकाळी चार वाजताच घरी पोहोचलो. कारण तिथे माझा नंबर खूप उशिरा होता. मला एकतर खूप कंटाळा आला होता. पण तेथील मुले चांगली भाषणे करत असल्यामुळे मी ऐकत बसलो. बऱ्याच मुलांनी एकाच विषयावर भाषण केले - 'अरे माणसा माणसा कधी होशील माणूस?' विषय interesting असल्यामुळे मी ऐकत होतो. नंतर माझे भाषण झाले. खरेतर भाषण करण्याचा मला कधी फारसा अनुभव नव्हता. त्यामुळे नंबर काही आलाच नाही. (येणार नव्हता हेही ठाऊक होते.)

घरी आल्यावर मात्र आईने चांगलेच धारेवर धरले. पूर्ण दिवस वाया घालवलास. तेही परीक्षा जवळ आली असताना! आई असे म्हटल्याने माझे टेन्शन वाढले. दुसऱ्या दिवशी मित्रांकडून हेच वाक्य ऐकून मला कालचा दिवस वाया घालवल्याचा पश्चाताप होऊ लागला आणि त्या सरांचा पण राग आला. पण करणार काय? दिवस वाया गेला तो गेलाचे.

परीक्षा सुरू झाली. दरवर्षीप्रमाणे पहिला पेपर मराठीचा होता. हॉलबाहेर सगळे टेन्शनमध्ये एकमेकांना विचारत

होते 'तुझा अभ्यास झाला का रे?' मला निबंधाचे टेन्शन आले होते. वर्गात गेलो. उत्तरपत्रिका व प्रश्नपत्रिका वाटल्या. तेव्हा प्रश्नपत्रिका पाहिल्याबरोबर सगळे एकमेकांकडे बघून विचारायला लागले, 'निबंधाचे काय करायचे? किती अवघड निबंध आहे.'

माझे टेन्शन जास्तच वाढले. म्हणून मी निबंधाचा भाग दुमडला. तो न बघताच दुसऱ्या प्रश्नापासून उत्तरे लिहू लागलो. मनात निबंधाचे टेन्शन होतेच. प्रश्न पण तसे अवघड होते. पण सोडवले एकदाचे.

शेवटची ३५ मिनिटे राहिली होती. आणि मला निबंध लिहायचा होता. मी आधी पहिला निबंध बघितला. तो होता, 'जखमी सैनिकाचे आत्मवृत्त.' या विषयी कोणतीच कल्पना मनात येत नव्हती. म्हणून पुढचा निबंध पाहिला. तोही कधी वाचलेला वगैरे नसल्याने कल्पनाच सुचत नव्हत्या. नंतर तिसरा निबंध वाचला. तो होता 'झाडे नसती तर...!' हा निबंध सोपा वाटला. म्हणून त्याचे शीर्षक लिहिले. निबंधाला सुरुवात केली. पण झाडे नसती तर... काय? माणूसच नसता! संपला विषय! त्यामुळे याविषयीही काही सुचेना. आता अखेरचा चौथा निबंधराहिला होता. त्याच्यावर नजर फिरवली आणि मला शिट्ट्या माराव्याशा वाटल्या. कारण तो निबंध होता - 'अरे माणसा माणसा कधी होशील माणूस?'

ह्या विषयावरची जवळजवळ १५-२० भाषणे मी ऐकली होती. जो येईल तो सर्रास याच विषयावर बोलत होता व मी पण आवडीने ऐकत बसलो होतो. आता माझ्या मनात वाक्ये तयार होत होती. मी पटकन पेन उचलला. झाडे नसती तर... हे शीर्षक खोडले व लिहिले 'अरे माणसा माणसा कधी होशील माणूस?'. शेवटच्या तीस मिनिटांत माझा निबंध पूर्ण झाला. व अतिशय समाधानाने माझी अवघड असूनही निबंधामुळे सोपी गेलेली उत्तरपत्रिका शिक्षकांना दिली.

बाहेर आल्यावर सगळे मित्र विचारू लागले, 'काय खतरनाक पेपर लिहीत होतास रे तू? जेव्हा बघावे तेव्हा तुझी मान खालीच.' माझ्या वर्गातील सर्व मुलांनी एकाच विषयावर निबंध लिहिला होता. 'झाडे नसती तर...!' माझ्या एका मित्राला पेपर खूप अवघड गेल्याने त्याने पेपर काढणाऱ्या मंडळींचा शब्दांनी भरभरुन सत्कार केला. परंतु मी मात्र

मनात निबंधाचे विषय काढणाऱ्या व्यक्तीचे मनापासून आभार मानीत होतो. निकालाचा दिवस आला. मला मराठीत ८५ मार्क मिळाले होते. व वर्गात मीच हायस्ट होतो. तेव्हा मला जाणवले की आईच्या व मित्रांच्या दृष्टीने ती स्पर्धा म्हणजे माझ्यासाठी टाईमपास होती व त्यामुळे माझे नुकसान झाले. पण माझ्या दृष्टीने तो दिवस सत्कार्णी लागला होता. कारण जर मी त्या स्पर्धेत भाग घेतला नसता तर कदाचित मला एवढे मार्क मिळाले नसते.

मला बिरबलाचे एक वचन आठवले, "जे होते ते भल्यासाठीच!"

❑

(छंद प्रदर्शन पान ७ वरून)

नाहीत म्हणून काही मुला-मुलींनी घरून बेडशीटस् आणले. नंतर त्यावरप्रत्येकाच्या वस्तू मांडल्या. सर्व मांडून झाल्यानंतर T.V. हॉल एवढा सुंदर दिसायला लागला होता की विचारूच नका. बाईंनी सांगितले ५-५ मुलांचे ग्रुप करा व आलटून पालटून स्वयंसेवकाचे काम करा. मग दुसऱ्या दिवशी १५ तारखेला आमच्या प्रदर्शनाचे मंजूताईंच्या हस्ते उद्घाटन झाले व आम्ही स्वयंसेवकाचे बिल्ले लावून आपापल्या छंदाजवळ उभे राहिलो. काही वेळाने पालक आले. आता T.V. हॉलमध्ये गर्दी झाली. सर्व पालक छंद पाहून खूश झाले. प्रतिकला तर एक पालक म्हणाले, "तुझ्या ग्रीटिंग्जचे मुंबईला प्रदर्शन भरवावे एवढी सुंदर आहेत ती". ओंकारला मेणबत्त्यांची ऑर्डर मिळाली. सर्व पालकांनी अभिप्रायामध्ये प्रदर्शन खूप आवडले व प्रत्येकाने आपला छंद पुढे जोपासत रहावा असे लिहिले होते. दोन दिवस सतत पालक, विद्यार्थी व शिक्षक प्रदर्शन पहायला येत होते. तिसऱ्या दिवशी आम्ही प्रदर्शन काढले. पण अजूनही कोणाच्याच मनातून प्रदर्शन पुसले गेले नाही इतके ते मनावर ठसले होते.

❑

## निवारा

पुरगस्त उभे राहीले
झाडाच्या आडोशाला
लष्कराची बोट आली
पुरग्रस्तांना आनंद झाला
माणसांनी आरोळ्या ठोकल्या
बोट आली न्यायला
लोकांना घेऊन बोट चालू लागली
सुरक्षित स्थली जायला
घालून लोकांना बोटीत
लोकांना नेले सोगलीत

इकडे आड तिकडे विहिर
घरी पूर सांगलीत पूर
दोन्हीकडे तशीच स्थिती
काय करावे प्रश्न पडला
ना झोप ना रहायला
पाणी नाही प्यायला
अन्नाची तर गोष्टच सोडा

**शेषा जोशी**
इयत्ता ४ थी

**(नशिबाने मिळवले... पान ११ वरून)**
अचानक माझ्या चेहऱ्यावर लहान लहान फोड आले आणि थोडासा ताप पण होता. मी शाळेत गेल्यावर मंजूताईंकडे गेले व त्यांना विचारले "मंजूताई, हे फोड कसले आहेत?". त्यांनी जरा वेळ पाहून सांगितले "रेश्मा तुला कांजिण्या झाल्या आहेत.तुला आता घरीच राहावे लागेल. तू सूत्रसंचालन कशी करणार?" आणि त्याच क्षणी माझ्या डोळ्यातून गंगा जमुना वाहू लागल्या. संधी आली होती पण सोय राहिली नव्हती.कित्येक दिवस मी सूत्रसंचालनाचे प्रॅक्टिस करत होते. पण आता तर मला गॅदरिंगमध्येच भाग घेता येणार नव्हता. मला असेच म्हणावे लागेल "सूत्रसंचालन नशीबाने मिळवले पण कांजिण्यांनी गमावले". ❑

### स्नेहमेळावा २००६

२००६ मध्ये कमला निंबकर बालभवनचा दहावीचा दहावा वर्ग बाहेर पडत आहे. या दहाही वर्गांचा एक दिवसाचा स्नेहमेळावा दिनांक ११ जून २००६ रोजी सकाळी नऊ वाजता आयोजित केला आहे. अधिक माहितीसाठी शाळेशी संपर्क साधावा. आपल्या सूचना कळवाव्यात. सर्व माजी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना हे प्रेमाचे व आग्रहाचे निमंत्रण आहे.



ऐन्याच्या आदिवासी भागातील एन. ओ. एस. चे विद्यार्थी



जांबोरी : साहसी खेळ



वृक्षगणना २००६



वृक्षगणना २००६